cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१३५ | बुधवार, दि.१० सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### लालबागचा राजा

मुंबईतील गणेशोत्सवाचा सर्वात लौकिकप्राप्त उत्सव, २०२५ मधील विसर्जन प्रक्रियेदरम्यानच्या तराफा प्रकरणामुळे चर्चेत आला. ६ सप्टेंबर २०२५ रोजी सुरू झालेल्या विसर्जन मिरवणुकीला गिरगाव चौपाटीवर १३ तासांचा विलंब झाला, ज्यामुळे तांत्रिक त्रुटी, परंपरेची उपेक्षा आणि सामाजिक भावनांचा उद्रेक यांवर प्रकाश पडला. हे प्रकरण केवळ लालबागपुरते मर्यादित नसून, परंपरा आणि आधुनिकीकरण यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे. गुजरातमधील श्री गणेश इव्हेंट्स अँड लॉजिस्टिक्स या अहमदाबादस्थित कंपनीला यांत्रिक तराफ्याचे कंत्राट देण्यात आले होते.

### पंतप्रधानांकडून पंजाब पूरग्रस्त भागांचे हवाई सर्वेक्षण

गुरूदासपूर : हिमाचलनंतर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंजाबमधील पूरग्रस्त भागांचे हवाई सर्वेक्षण करत केले. यानंतर ते गुरुदासपूरमधील पुरामुळे बाधित झालेल्या लोकांना भेटले आणि त्यांच्या समस्या ऐकल्या. तत्पूर्वी, पंतप्रधानांनी कुल्लू, मंडी आणि चंबा येथील नुकसानीचे हेलिकॉप्टरने हवाई सर्वेक्षण केले. त्यानंतर, धर्मशाला येथे आपत्तीसंदर्भात एक बैठक झाली, ज्यामध्ये अधिकाऱ्यांनी त्यांना सादरीकरणाद्वारे नुकसानीची माहिती दिली. यावेळी त्यांनी १५०० कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. केंद्र सरकार सर्वतोपरी मदत करेल असे पंतप्रधान म्हणाले. मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५०,००० रुपये दिले जातील. मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू हे देखील या बैठकीत उपस्थित होते.

## थोडक्यात...

### भारत दहशतवाद सहन करणार नाही – पंतप्रधान

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रायलची राजधानी जेरुसलेममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला असून त्यांनी पीडितांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांनी असेही म्हटले की, जेरुसलेममध्ये निष्पाप लोकांवर झालेल्या भयंकर दहशतवादी हल्ल्याचा मी तीव्र निषेध करतो. आम्ही पीडितांच्या कुटुंबियांबद्दल आमच्या मनापासून संवेदना व्यक्त करतो आणि जखमींना लवकर बरे होण्याची इच्छा करतो. भारत सर्व प्रकारच्या दहशतवादाचा निषेध करतो आणि दहशतवादाविरुद्ध शून्य सहनशीलतेचे धोरण राखतो. भारत दहशतवाद सहन करणार नाही, असे ते म्हणाले.

### नांदेड विमानसेवा आजपासून सुरू

नांदेड : श्री गुरुगोविंदसिंगजी विमानतळ दि. २२ ऑगस्ट रोजी अनिश्चित काळासाठी बंद करण्याचे आदेश विमान प्राधिकरण विभागाकडून देण्यात आले होते. तात्काळ विमानसेवा बंद झाल्यामुळे नांदेडात त्यावेळी उलटसुलट चर्चाही झाली. परंतु नांदेड विमानतळाच्या धावपट्टीवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याचे निदर्शनास आले होते. यामुळे कुठलाही अनर्थ घडू शकतो, या अनुषंगाने तात्काळ विमानसेवा बंद करण्यात आली होती. ही बाब जिल्हाधिकारी नांदेड यांनी गंभीरतेने घेत कुठलाही गाजावाजा न करता धावपट्टीचे काम पूर्ण केले. त्यांच्या परिश्रमामुळे व सातत्याच्या पाठपुराव्यामुळे आजघडीला नांदेड येथील विमानसेवा बुधवारी दि. १० सप्टेंबरपासून सुरू करण्यात येत आहे.

### राहुल गांधी ब्रिटिश नागरिक असल्याचा दावा

नवी दिल्ली : काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नागरिकत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. कर्नाटकमधील भाजपचा कार्यकर्ता असणाऱ्या त्या याचिकाकर्त्याचा जबाब मंगळवारी ईडीने नोंदवला. राहुल ब्रिटीश नागरिक असल्याचा दावा संबंधित याचिकेतून करण्यात आला आहे. ती याचिका भाजपचे कार्यकर्ते एस.विग्नेश शिशिर यांनी दाखल केली. त्यांना परकी चलन व्यवस्थापन कायद्यातील (फेमा) तरतुदींतर्गत ईडीने समन्स बजावले. त्यानुसार ते जबाब नोंदवण्यासाठी दिल्लीतील ईडीच्या कार्यालयात हजर राहिले. त्यांना राहुल यांच्या संदर्भात केलेल्या दाव्याशी संबंधित काही प्रश्न ईडीच्या अधिकाऱ्यांनी विचारले. शिशिर यांनी त्यांच्याकडे ब्रिटीश सरकारची काही कागदपत्रे, ईमेल्स असल्याचे याचिकेत नमूद केले आहे.

### सोन्याच्या दराचा नवा उच्चांक, १ लाखाच्या पुढे

नवी दिल्ली : सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ पाहायला मिळाली आहे. जीएसटीसह ) सोन्याच्या दराने १ लाख १२ हजारांचा टप्पा ओलांडला आहे. तर चांदीच्या दरात देखील मोठी झाल्याचं पाहायला मिळालं. जीएसटीसह सर्राफा बाजारात चांदीचे दर १२८४२९ रुपये किलो झाले आहेत. २४ कॅरेट सोन्याचे एका तोळ्याचे सोन्याचे दर जीएसटीसह ११२४१७ रुपयांवर पोहोचेल आहेत. आयबीजेएच्या माहितीनुसार सोमवारी चांदीचा जीएसटी शिवायचे दर १२४४१३ रुपये होता. सोन्याचा एका तोळ्याचा जीएसटी शिवायचा दर १०८०३७ रुपये इतका होता.

### गोकुळ आता आईस्क्रीम, चीज बाजारात आणणार

कोल्हापूर: गोकुळ दूध संघ आता आईस्क्रीम आणि चीज ही दोन नवी उत्पादने बाजारात आणणार असल्याची घोषणा अध्यक्ष नविद मुश्रीफ यांनी मंगळवारी (दि. ९) वार्षिक सर्वसाधारण सभेत केली. कागल येथील पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील महालक्ष्मी पशुखाद्य कारखाना येथे गोकुळची ६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. गोकुळ पुढील काही दिवसात २० लाख लिटरचा टप्पा पार करेल. तर २५ लाख लिटर दूध संकलनाचे उदिष्ट्य ठेवले असल्याचे नविद मुश्रीफ यांनी सांगितले. आगामी काळात गोकुळ दूध संघाचा त्यांची दुग्धजन्य उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये उपलब्ध करण्याच्या मानस आहे. गाभण जनावरांसाठी 'प्रेग्नेंसी रेशन' पशुखाद्यही आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

# ६० हजार शेतकरी 'पीएम किसान' पासून वंचित

## योजनेत मोठा बदल, विरोधकांचा सरकारवर हल्ला

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात ६० हजार शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही. बदललेल्या नवीन नियमामुळे एका झटक्यात हे शेतकरी योजनेबाहेर फेकल्या गेले. यापूर्वी लाडकी बहीण योजनेत अनेक चाळण्या लावण्यात आल्या. आता अशीच निकषांची चाळणी लावत शेतकऱ्यांना या योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी याविषयी एक्स या समाज माध्यमावर एक पोस्ट करीत सरकारच्या भूमिकेवर सडकून टीका केली.**




पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेत मोठा बदल झाला आहे. केंद्र सरकार या योजनेत शेतकऱ्याला ६ हजारांचा वार्षीक हप्ता देते. आता या योजनेत एक बदल करण्यात आला आहे. त्यानुसार, पती आणि पत्नीच्या नावावर शेती असेल तर केवळ पत्नीलाच मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकरी पतीला मानधन देण्यात येणार नसल्याचे

पान २ वर

### जीएसटीत कपात, लगेचच हप्ता थांबवला

एकीकडे जीएसटीमध्ये कपात करून दिंडोरा पिटायचा आणि दोनच दिवसात शेतकऱ्यांचे पीएम किसान योजनेचे हफ्ते बंद करायचे. केंद्र सरकारला हे शोभते का? आधीच पीएम किसानचे पैसे मिळतात म्हणून लाडक्या बहिणींना लाडक्या बहीण योजनेच्या मदतीपासून राज्य सरकारने वंचित ठेवले आणि आता लाडक्या भावांना वंचित ठेवत आहेत. नैसर्गिक आपत्तीचा फटका आणि केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांचा फटका सर्वच शेतकऱ्यांना बसतो आहे. केंद्र सरकारने पुनर्विचार करावा, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

### नमो शेतकरी योजनेचा हप्ता खात्यात जमा – फडणवीस

राज्य सरकारच्या 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेचा हप्ता मंगळवारी (दि.९) शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आला आहे. ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या खात्यात १८९२ कोटी ६१ लाख रूपये जमा करण्यात अल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, राज्यातील शेतकऱ्यांना दरवर्षी १२ हजार रूपये मिळतात. तीन हप्त्यांमध्ये हे पैसे देत असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी २० वा हफ्ता दिला. यानंतर आपणही नमो शेतकरी महासन्मान योजनेचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले, असे ते म्हणाले.

# सीपी राधाकृष्णन देशाचे नवे उपराष्ट्रपती! ४५२ मतांनी विजयी

नवी दिल्ली । वृतसंस्था

**भाजपचे वरिष्ठ नेते सीपी राधाकृष्ण यांची देशाच्या नव्या उपराष्ट्रपतीपदी निवड करण्यात आली आहे. संसदेतील निवडणूक प्रक्रियेत त्यांचा विजय निश्चित झाल्यानंतर अधिकृत घोषणा करण्यात आली. ते ४५२ मतांनी विजयी झाले. एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन आणि इंडिया ब्लॉकचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांच्यात ही लढत होती.**



देशाच्या १७ व्या उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी मंगळवारी संसद भवनात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान पार पडले. एकूण ७६८ खासदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. भारतीय संसदेत लोकसभा आणि राज्यसभेसह एकूण ७८८ खासदार आहेत. सध्या दोन्ही सभागृहात ७ जागा रिक्त आहेत. अशाप्रकारे एकूण ७८१ खासदारांना मतदान करायचे होते, त्यापैकी १३ जणांनी मतदानात भाग घेतला नाही. यापैकी बीआरएसचे ४, बीजेडीचे ७, अकाली दलाचे १ आणि १ अपक्ष खासदाराने मतदान केले नाही. सकाळी १० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम मतदान केले. एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांनी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विजय मिळवला. मतमोजणीच्या वेळी ७५२ मते वैध आढळली आणि १५ मते अवैध

पान २ वर

# राष्ट्रवादी काँग्रेससह १५ राजकीय पक्षांना नोटीस




नवी दिल्ली । वृतसंस्था

बिहारच्या विधानसभा निवडणुकीआधी या राज्यातील नोंदणीकृत परंतु राजकीयदृष्ट्या पूर्ण निष्क्रियावस्थेत पोहोचलेल्या किमान १५ राजकीय पक्षांचे भविष्य आता निवडणूक आयोगाच्या हाती आहे. गेल्या किमान सहा वर्षांपासून हे सारेच पक्ष निष्क्रिय आहेत. या पक्षांनी एकही निवडणूक लढवली नाही. यावर आयोगाने या पक्षांविरुद्ध कडक भूमिका घेताना त्यांना नोटीसा बजावल्या आहेत.

आयोगाच्या निर्णयामुळे आगामी बिहार विधानसभा निवडणुकीची रंगत अधिकच वाढताना दिसत आहे. या यादीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाही समावेश

पान २ वर

### या पक्षांचा समावेश?

ज्या १५ पक्षांवर मान्यता रद्द होण्याची टांगती तलवार आहे ते असे, भारतीय अवाम कार्यकर्ता पार्टी, भारतीय जागरण पार्टी, भारतीय युवा जनशक्ती पार्टी, एकता विकास महासभा पार्टी, गरीब जनता दल (धर्मनिरपेक्ष), जय जनता पार्टी, जनता दल हिंदुस्थानी, लोकतांत्रिक जनता पार्टी (धर्मनिरपेक्ष), मिथिलांचल राष्ट्रवादी पार्टी, राष्ट्रीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय सद्भावना पार्टी, वसुधैव कुटुंबकम पार्टी, वसुंधरा जन विकास दल आणि यंग इंडिया पार्टी.

## गेवराईत हाके समर्थका विरोधात गुन्हे दाखल

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकाऱ्यांनी मनाई आदेश लागू केलेला असतांनाही प्रा.लक्ष्मण हाके यांच्या स्वागतासाठी बेकायदेशिर व कोणत्याही प्रकारची प्रशासनाची रितसर परवानगी न घेता गर्दी केल्याप्रकरणी पोलीस प्रशासनानेच दिलेल्या फिर्यादीवरून १७ जणांविरूध्द गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान गेवराईतील छत्रपती संभाजी महाराज चौकात प्रा.हाके यांचे केलेले स्वागत संबंधित समर्थकांच्या चांगलेच अंगलट आल्याचे यावरून दिसुन येते.पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, गेवराई शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकात दि.७ सप्टेंबर रोजी ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांचे जंगी स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी बीड यांनी कलम ३७ (१)(३) महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे मनाई आदेश लागू केलेला असतांना स्वागताच्या कार्यक्रमासाठी कसल्याही प्रकारची प्रशासकीय परवानगी न घेता आदेशाचे उल्लंघन केल्याचे समोर आले. त्यानुसार गेवराई पोलीस ठाण्यातील पो.ह.संजय सोनवणे यांच्या फिर्यादीवरून युवराज कोकरे, राम धवन,

पान २ वर

# गेवराईतील उपसरपंचाची डोक्यात गोळी झाडून बार्शीत आत्महत्या



गेवराई । प्रतिनिधी

**तालुक्यातील लुक्का मसला येथील उपसरपंच गोविंद बारगे यांचा मृतदेह बार्शी तालुक्यात कार मध्ये आढळून आला पोलिसांनी केलेल्या तपासणीमध्ये सदर व्यक्तीने डोक्यात पिस्तूल मधून गोळी झाडून आत्महत्या केली मात्र ही आत्महत्या आहे की हत्या याबाबत गेवराई तालुक्यामध्ये चर्चा सुरू आहे. त्यांनी एवढ्या टोकाचे पाऊस का उचलले याविषयी तर्कवितर्क लडवले जात आहेत.**

गोविंद जगन्नाथ बरगे (वय ३८) रा. लुखामसला ता. गेवराई असे मृत

पान २ वर

# परळीत अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## आठवड्यातील दुसऱ्या घटनेने संतापाची लाट

परळी । प्रतिनिधी

परळी शहर सध्या अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमुळे हादरले आहे. रेल्वे स्थानकात सहा वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराची घटना ताजी असतानाच शहरात आठवड्याभरात बलात्काराची दुसरी घटना समोर आली आहे. शहरातील बरकतनगर भागात ही संतापजनक घटना घडली.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, परिसरातील एका १२ वर्षांच्या अल्पवयीन मुलीला काही नराधमांनी दुकानावर जात असताना रस्त्यातून उचलून नेले. अंधाराचा फायदा घेत तिला एका आडमार्गावरील पांदणीत नेऊन तिच्यावर अमानवीय पद्धतीने

पान २ वर

# कुणबी दाखले देण्याची प्रक्रियी सुरु ४५० गुन्ह्यांवरील कारवाई मागे घेणार

## मराठा आरक्षण उपसमिती अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटलांची माहिती



मुंबई। प्रतिनिधी

राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर लगेचच मराठा आरक्षण उपसमितीची बैठक झाली. या बैठकीत मराठा समाजाला कुणबी दाखले देण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, मराठा आंदोलनावेळी ५ लाख रुपयांपेक्षा कमी नुकसान झालेल्या आंदोलकांवरील गुन्ह्यांवर

पान २ वर

# सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या अवलादी ठेचल्याच पाहिजेत!

**बीड : कुठे एखादी लहान घटना घडली तर सोशल मीडियावर त्याचा एवढा बाऊ केला जातो की, त्यामुळे दोन धर्म, दोन समाजामध्ये वितुष्टता आणि तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट सुरू होतात. याचा शिरकाव पुन्हा एकदा राज्यात झाला आहे. विशेषत: बीड जिल्ह्यामध्ये त्याचा अधिक परिणाम दिसत असल्याने, सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या अशा अवलादीना पहिल्यांदा गावातीलच समजदार लोकांनी ठेचून पोलिसांच्या स्वाधीन केले पाहिजे, तरच हे कुठेतरी थांबेल असे सध्या तरी चित्र दिसत आहे.**

मराठा समाजाकडून आरक्षणाची मागणी आणि यासाठीचे आंदोलन सुरू झाल्यानंतर या सर्व बाबी सुरू झाल्या. या आंदोलनाला प्रति आंदोलन सुरू झाले. अंतरवली सराटीतून सुरू झालेल्या आंदोलना विरोधात वडीगोद्रीमध्ये देखील आंदोलन सुरू झाले.




राज्य लोकतंत्र

पुढे ते राज्यभर पसरले. मात्र त्याचे दूरगामी परिणाम विशेष करून ग्रामीण भागात अधिक दिसून आले. राज्य पातळीवरील नेत्यांनी कितीही आरोप – प्रत्यारोप केले तरी त्याचा फारसा परिणाम होत नाही, मात्र गावगाड्यात राहणाऱ्या अनेकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. यामुळेच रोज पारावर

पान २ वर

### गावकरी अन् पोलिसांची भुमिका महत्वाची

**अशा नतदृष्ट अवलादीना ठेचण्याची गरज आहे. मग ती गावकऱ्यांनी असो की पोलिसांनी असो. त्याशिवाय विस्कटलेली घडी सुस्थितीत येणार नाही. पोलीस अधीक्षकांनी सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट करणाऱ्यांना तंबी दिली असली तरी पोलीस कुठपर्यंत लक्ष ठेवणार आहेत. त्यासाठी प्रत्येकाने एक जबाबदार नागरिक म्हणून अशावर वचक ठेवला पाहिजे. ही परिस्थिती चिघळू नये, पुन्हा अंतरवली ते वडीगोद्री आंदोलन आणि माजलगाव ते बीड जाळपोळ अशा घटना घडू नयेत. यासाठी आता पोलिसांनीही कणखर भूमिका घेण्याची गरज आहे.**

## जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाविरोधात कर्मचारी समुहीक रजेवर

बीड । प्रतिनिधी

**कोणतेही म्हणणे मांडण्याची संधी न देता गेवराईतील दहा कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या या कारवाईच्या निषेधार्थ महसुल कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा संप केला. निलंबन मागे न घेतल्या बेमुदत संपावर जाण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिल्यामुळे आज शासकीय कार्यालयामध्ये शुकसुकाट जाणवत होता.**

आज दि.९ रोजी सर्व महसूल कर्मचारी एक दिवसाच्या सामुहिक रजेवर गेले आहेत. उद्यापर्यंत निलंबन मागे न घेतल्यास उद्या दि.१० सप्टेंबरपासून लेखणी बंद करून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. एकाच वेळी १२०० कर्मचाऱ्यांच्या सामुहिक रजेमुळे कार्यालयामध्ये शुकशूकाट पहायला मिळू लागला आहे. दरम्यान या संदर्भात माध्यमांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना विचारले असता आंदोलन सुरू असल्याची मला माहिती नाही असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे कर्मचारी संघटनेसह तब्बल ५४ कर्मचाऱ्यांच्या

पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०९ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १४.०० क्विंटल | २,५०० | २,७०४ | २,६०९ |
| ज्वारी/हायब्रिड :६५.५० क्विंटल | १,९५१ | २,८०० | २,२६८ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : २०.०० क्विंटल | ५,४०० | ६,१०१ | ५,८५० |
| उडीद : ८०.०० क्विंटल | ३,८२० | ६,१०० | ५,२६६ |
| बाजरी: ३८.०० क्विंटल | २,४०० | २,८८० | २,६१४ |
| मुग: ३३.५० क्विंटल | ४,९०० | ७,९५० | ६,१०० |
| सोयाबीन: ७.५० क्विंटल | ४,३५१ | ४,३५१ | ४,३५१ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,८५० | ६,८५० | ६,८५० |

cmyk

## अग्रलेख

# लालबागचा राजा

मुंबईतील गणेशोत्सवाचा सर्वात लौकिकप्राप्त उत्सव, २०२५ मधील विसर्जन प्रक्रियेदरम्यानच्या तराफा प्रकरणामुळे चर्चेत आला. ६ सप्टेंबर २०२५ रोजी सुरू झालेल्या विसर्जन मिरवणुकीला गिरगाव चौपाटीवर १३ तासांचा विलंब झाला, ज्यामुळे तांत्रिक त्रुटी, परंपरेची उपेक्षा आणि सामाजिक भावनांचा उद्रेक यांवर प्रकाश पडला. हे प्रकरण केवळ लालबागपुरते मर्यादित नसून, परंपरा आणि आधुनिकीकरण यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे. गुजरातमधील श्री गणेश इव्हेंट्स अँड लॉजिस्टिक्स या अहमदाबादस्थित कंपनीला यांत्रिक तराफ्याचे कंत्राट देण्यात आले होते. हा तराफा मागील तराफ्यापेक्षा तीनपट मोठा होता, परंतु त्याच्या तांत्रिक अडचणी आणि भरती–ओहोटीच्या वेळेचा चुकीचा अंदाज यामुळे मूर्ती वाळूत रुतली आणि प्रक्रिया रखडली. या प्रकरणाने कोळी समाजाची नाराजी, सामाजिक गटांचा असंतोष आणि मंडळाच्या नियोजनातील त्रुटी यांना चव्हाट्यावर आणले.

लालबागच्या राजाच्या विसर्जनाची जबाबदारी पारंपरिकपणे कोळी समाज आणि वाडकर कुटुंबीयांकडे होती. कोळी समाजाची गणरायावरील अपार भक्ती आणि समुद्राच्या लयीचा वर्षानुवर्षांचा अनुभव यामुळे त्यांची विसर्जन प्रक्रिया अचूक आणि निर्विघ्न पार पडत असे. त्यांनी प्रत्येक आव्हानाला तोंड देत स्वत:ची पद्धत विकसित केली, जी श्रद्धा, कौशल्य आणि परंपरेच्या मिश्रणातून बनली आहे. यंदा मंडळाने ही जबाबदारी गुजरातमधील कंपनीला दिली, ज्यांना स्थानिक परिस्थिती आणि परंपरांचा अनुभव नव्हता. पाण्याच्या पातळीमुळे मूर्ती तराफ्यावर चढवणे शक्य झाले नाही, आणि ती वाळूत रुतल्याने प्रक्रिया बाधित झाली. यामुळे कोळी समाजाला त्यांच्या सांस्कृतिक वारशाला धक्का बसल्याची भावना निर्माण झाली. त्यांची नाराजी केवळ रोजगार गमावण्यापुरती नव्हती, तर त्यांच्या तपश्चर्या आणि श्रद्धेचा अनादर झाल्याची तीव्र भावना होती. मंडळाचे सचिव सुधीर साळवी यांनी तांत्रिक अडचणी आणि पावसामुळे भरती लवकर येण्याचे कारण सांगितले, परंतु कोळी समाजाला विश्वासात न घेणे ही मंडळाची मोठी चूक ठरली. मंडळाने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करताना परंपरेची उपेक्षा केली. नवीन तराफ्याची चाचणी आणि भरती–ओहोटीच्या वेळेचा योग्य अंदाज न घेतल्याने तांत्रिक अडचणी उद्भवल्या. मंडळाने स्थानिक अनुभवाला डावलून बाहेरील कंपनीवर विश्वास ठेवला, ज्यामुळे विसर्जन प्रक्रिया बाधित झाली. हा गोंधळ केवळ लालबागपुरता मर्यादित नाही. शासकीय पातळीवर, मोठ्या संस्थांमध्ये किंवा खासगी कंपन्यांमध्येही आधुनिकीकरणाच्या नावाखाली अशा चुका वारंवार होतात. लोक बदलाला विरोध करतात असे नाही, परंतु परंपरा आणि भावनांचा विचार न केल्याने अशा घटना घडतात. विसर्जनातील विलंबामुळे महाराष्ट्रातील विविध सामाजिक गटांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. मराठा समाजाने 'मंडळांनी आमच्या लोकांना उपाशी ठेवले, म्हणून गणराया नाराज झाला' अशी भावना व्यक्त केली, तर जैन समाजाने 'गणरायाचा प्रिय हत्ती वनताराला नेला, म्हणून तो विसर्जित झाला नाही' असे मत मांडले. या भावना लालबागच्या राजाभोवती असलेल्या प्रचंड श्रद्धा आणि प्रभावळीमुळे अधिक तीव्र झाल्या. लालबागचा राजा हा केवळ गणेशमूर्ती नसून, करोडो भक्तांच्या भावनांचे केंद्र आहे. दर्शनापासून ते विसर्जनापर्यंत व्हीआयपी संस्कृती, मंडळ पदाधिकाऱ्यांची अरेरावी आणि सामान्य भक्तांना दुय्यम स्थान यामुळे असंतोष वाढला आहे. सेलिब्रिटींचे आगमन, प्रसिद्धी आणि नवसाला पावणारा गणपती म्हणून निर्माण झालेली प्रभावळ यामुळे लालबागचा राजा मोठी गर्दी खेचतो. परंतु, याच प्रसिद्धीमुळे छोट्या चुका मोठ्या चर्चांना जन्म देतात.

लालबागच्या प्रकरणात कोळी समाजाला डावलणे म्हणजे या सामाजिक समतोलाला धक्का देणे होय. एकाधिकारशाही आणि एककल्ली निर्णयांनी कोणताही उत्सव दीर्घकाळ टिकत नाही. लालबागच्या मंडळाने यंदा आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करताना सामाजिक आणि सांस्कृतिक संवेदनशीलतेचा विचार केला नाही. यामुळे केवळ विसर्जन रखडले नाही, तर मंडळाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. लालबागच्या तराफा प्रकरणाने मंडळाला आणि समाजाला विचार करण्याची संधी दिली आहे. मंडळाने भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी परंपरा आणि तंत्रज्ञानाचा समन्वय साधणे गरजेचे आहे. कोळी समाजासारख्या स्थानिक समुदायांना विश्वासात घेऊन त्यांच्या अनुभवाचा आणि श्रद्धेचा आदर करणे आवश्यक आहे. तसेच, शासनाने अशा मोठ्या मंडळांच्या कार्यपद्धतीवर लक्ष ठेवून, गरज पडल्यास हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. लालबागचा राजा हा केवळ एक मंडळ नसून, करोडो भक्तांच्या भावनांचे केंद्र आहे. त्यामुळे त्यांच्या नियोजनात पारदर्शकता, समावेशकता आणि परंपरेचा आदर असणे अत्यावश्यक आहे. लालबागचा राजा हा श्रद्धेचा आणि सामाजिक एकतेचा उत्सव आहे. त्यामुळे भविष्यात असे गोंधळ टाळण्यासाठी मंडळाने स्थानिक समुदाय, परंपरा आणि भावनांचा आदर करणे गरजेचे आहे.

# उपसा जलसिंचन योजनांना पुढील दोन वर्षांसाठी वीज बिलात सवलत शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांसाठीच्या अतिउच्चदाब, उच्चदाब आणि लघुदाब उपसा जलसिंचन योजनेसाठीच्या वीजदर सवलत योजनेस आणखी दोन वर्षांसाठी म्हणजेच मार्च, २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यामुळे राज्यातील सुमारे १ हजार ७८९ उपसा सिंचन योजनांच्या खर्चात मोठी बचत होण्याबरोबरच त्याचा थेट फायदा या उपसा सिंचन योजनांशी निगडीत शेतकऱ्यांना होणार आहे.**

या वीजदर सवलत योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना पिकांसाठी पाणी उपलब्ध करणे सुलभ झाले आहे. यातून शेतीचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. त्यामुळे यापुर्वी जाहीर केलेली ही वीजदर सवलत योजना शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यात आणि त्यांच्या कृषि उत्पन्नात वाढ करण्यात सहायभूत ठरली आहे. त्यामुळेच या कल्याणकारी योजनेस ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेत अतिउच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकासाठींचा सवलतीचा वीजदर प्रति युनीट रुपये १.१६ रुपये आणि स्थिर आकार दरमहा २५ रुपये रुपये (प्रति के.व्ही.ए.) आणि लघुदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकासाठींचा सवलतीचा वीजदर प्रति युनिट एक रुपया आणि स्थिर आकार दरमहा रुपये १५ रुपये (प्रति अश्वशक्ती) अशी सवलत ३१ मार्च, २०२७ पर्यंत कायम ठेवण्यास मान्यता देण्यात आली. या सवलतीमुळे महावितरणला महसुली तुटीच्या भरपाईकरिता राज्य शासनाकडून २०२५–२६ या वार्षिक वर्षात ८८६ कोटी १५ लाख रुपये आणि २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी ८७२ कोटी २३ लाख रुपये देण्यास मान्यता देण्यात आली.

# बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्याची गुणवत्ता अव्वल

## सीईओ रहेमान यांचे हस्ते गटशिक्षणाधिकारी धनंजय शिंदे सन्मानित

बीड । प्रतिनिधी

शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई आणि वॉवेल्स ऑफ द पिपल्स असोशियेशन,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या 'मिशन जरेवाडी' गुणवत्ता विकास अभियान या विशेष उपक्रमाचे नुकतेच मुल्यांकन मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावर पार पडले. सदरच्या मुल्यांकनात बीड जिल्ह्यामध्ये गेवराई तालुक्याची गुणवत्ता सर्वोत्कृष्ट आली.

आज जिल्हा परिषदेच्या सभागृहात एका विशेष समारंभाचे आयोजन करून मु.का.अ.जितीन रहेमान यांचे हस्ते तालुक्याच्या गुणवंत शाळांचे शिल्पकार, प्रेरणास्तंभ तथा तालुक्याच्या शैक्षणिक प्रशासनाचे प्रमुख गटशिक्षणाधिकारी धनंजय



शिंदे यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार केला. तालुका तर गुणवत्तेत अव्वलस्थानी आलाच शिवाय गेवराई तालुक्यातील कें.प्रा.शा. गुळज, कें.प्रा.शा.पाचेगाव आणि प्रा.शा.टकलेवाडी कें. कोळगाव या तीन शाळाही गुणवत्तेत अव्वल ठरल्यामुळे त्या शाळांचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि शिक्षक यांचाही गौरव करण्यात आला. यासंदर्भात गेवराईचे गटशिक्षणाधिकारी धनंजय शिंदे यासंदर्भात म्हणाले, हा सन्मान माझा झाला असला तरी, याचे सर्व श्रेय तालुक्यातील वाडी, वस्ती आणि तांड्यावर अहोरात्र कष्ट घेऊन पिढी घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांना आहे. शिक्षकांचे शैक्षणिक उद्बोधन करणारे तालुक्याचे ज्येष्ठ शिविअ प्रविण काळम पाटील, पर्यवेक्षिय यंत्रणेतील सर्व केंद्रप्रमुख, केंद्रीय मुख्याध्यापक, घटक शाळांचे मुख्याध्यापक आदी सर्वांना जाते. त्यांनी ध्येयवेडे होऊन वर्षभरात घेतलेल्या कष्टाचे या पुरस्कार स्वरूपात रूपांतर झाले. मंगळवारी झालेल्या स्वागत आणि सत्काराबद्दल गटशिक्षणाधिकारी धनंजय शिंदे यांचे गेवराई आ. विजयसिंह पंडित, जि.प.चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) प्रदिप काकडे, शिक्षणाधिकारी (प्रा.) भगवान फुलारी, गेवराई गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, कास्ट्राईब महासंघाचे महासचिव बापूसाहेब ससाणे, शिक्षक संघाचे नेते नामदेव शिंदे, केंद्रप्रमुख नारायण मराठे, गोविंद शेळके, शिक्षक गणेश फड यांचेसह अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पान ६ वरून...

### चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या

या ठिकाणी निषेध सभा झाली. या सभेत दलित अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीच्या वतीने विविध नेते व कार्यकर्ते यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रविवार, दि.३१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री पंढरपूरहून परळी येथे कामाच्या शोधात आलेले एस.सी.मागासवर्गीय समाजाचे एक कुटूंब परळी रेल्वे स्टेशन परिसरात झोपले असता पाच वर्षाच्या मुलीला निर्जन ठिकाणी घेऊन जाऊन तिच्यावर अत्याचार केला आहे. पिडीत मुलगी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रूग्णालय, अंबाजोगाई येथे उपचार घेत आहे. परळी रेल्वे स्टेशनवर ३१ ऑगस्ट रोजी रात्री जे रेल्वे पोलीस ड्यूटीवर होते. तसेच परळी संभाजीनगर पोलीस स्टेशनचे जे कर्मचारी ड्यूटीवर होते. त्यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे सदरील घटना घडली आहे. बीड जिल्हामध्ये प्रामुख्याने परळी पोलीस आपल्या कर्तव्यात कसूर करीत असल्यामुळे परळी शहरामध्ये गुन्हेगार लोकांवर पोलिसांचा वचक राहीलेला नाही. परळी पोलिस नको त्या बाबींमध्ये व्यस्त असल्याने रात्री दिलेल्या ड्यूट्या ते सक्षमपणे बजावत नसल्यामुळे एस.सी.समाजाच्या गरीब कुटुंबावर अशी बिकट वेळ आली आहे. जे पोलीस रात्री ड्युटीवर असताना सहा वर्षाच्या मुलीवर अत्याचार झाला त्या गुन्हात पोलिसांना ही सहआरोपी करा तसेच पिडीत कुटूंबाचे तात्काळ पुनर्वसन करून त्यांना शासकिय सेवेत समाविष्ट करा. आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, सदर प्रकरणाची सुनावणी फास्ट ट्रॅक कोर्टात व्हावी या मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. सदरील निवेदन शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रशासनाला देण्यात आले. अंबाजोगाईकरांनी दलित अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीच्या माध्यमातून काढलेल्या निषेध मोर्चात मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाचे तसेच श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी, विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांचे नेते, प्रमुख कार्यकर्ते, पत्रकार, समाजसेवक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, युवती आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.

-------------

### केजमध्ये ओबीसींचा मोर्चा

दिसत नाही. मात्र तरीही आम्हाला ओबीसी मधूनच आरक्षण पाहिजे असा हट्ट करत मागच्या दोन वर्षांपासून ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण करण्यात आले आहे. आंदोलन असो वा दबाव असो अशा काही गोष्टींना बळी पडून ओबीसी समाजाला जाचक असे काही सरकारने निर्णय घेतलेले आहेत. मात्र तरीही शांत असलेल्या ओबीसी समाजावर प्रचंड अन्याय होईल असा दोन सप्टेंबर ला एक जीआर काढण्यात आला आणि त्यामध्ये शब्दांचा खेळ करून केवळ प्रतिज्ञापत्रावर सुद्धा कुणबी प्रमाणपत्र काढता येईल असे काही मुद्दे घालण्यात आले. त्यामुळे ओबीसी समाजामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून एवढे दिवस शांत असलेला ओबीसी समाजाचा खडबडून जागा झाला आहे. आणि आता मात्र संघर्ष करावा लागतो हे त्यांच्याही लक्षात आलेले आहे आणि म्हणून जीआर काढला त्याच्या दुसऱ्या दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: मराठवाड्यामध्ये ठिकठिकाणी आंदोलने, निदर्शने, मेळावे होऊ लागलेले आहेत. आणि त्याच अनुषंगाने केज येथेही समता परिषदेचे विभागीय अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली रॅली काढून आणि प्रचंड घोषणाबाजी करत ओबीसी बांधव तहसीलवर धडकले आणि केजचे तहसीलदार यांना एक निवेदन देण्यात आले. आणि यामध्ये मराठा समाजाचा ओबीसी मध्ये समावेश करू नये असा अशी प्रमुख मागणी करण्यात आली. यावेळी तालुक्यातील समता परिषदेचे तालुकाध्यक्ष सचिन राऊत, नाभिक संघटनेचे नवनाथ टोपे, दलित चळवळीचे चंद्रकांत खरात, उपसरपंच श्री.चौरे, कुंभार संघटनेचे श्री.कुंभार, सचिन रोडे राम मेजर राऊत,सरपंच आशोक राऊत,कपिल राऊत,रावसाहेब दादा राऊत,कटारे मामा यांच्यासह ओबीसी बांधव मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

-------------

### डिजिटल मीडिया

कार्याध्यक्ष काटकर ,सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे ,कोषाध्यक्ष शेख मन्सूर भाई ,डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी तीन वाजता राज्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक या ठिकाणी होणार आहे. या अधिवेशनाला आणि बैठकीला उपस्थित राहणे पदाधिकाऱ्यांना अनिवार्य आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके,जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय अरबुने ,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हांगे यांनी केले आहे.

-------------

### बुद्धिबळ स्पर्धेसाठी

सेंट झेवियर्स स्कूलच्या इयत्ता आठवीत शिक्षण घेत असलेल्या मनस्वी दिनकर शिंदे हिने चाणाक्ष पद्धतीने डावपेच टाकत प्रतिस्पर्धी खेळाडूचा पराभव करून तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. १४ वर्षातील गट (मुली) यात सेंट झेवियर्स स्कूलच्या मनस्वी दिनकर शिंदे हिने दुसऱ्यांदा बाजी मारली. यापूर्वी मनस्वी शिंदे हिची बहीण मृणाल दिनकर शिंदे हिनेही १७ वर्षा आतील मुलींच्या गटात परळी येथे झालेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत गेवराई तालुक्याचे प्रतिनिधित्व केले होते. तर गेल्या वर्षी मनस्वी दिनकर शिंदे हिने जिल्हास्तरावर प्रतिनिधित्व केले होते. दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा बीड येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल मध्ये होणार आहे. जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल मनस्वीचे प्राचार्य फादर पीटर खंडागळे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल भालेकर, कलाविष्कार प्रतिष्ठानचे कार्यवाहक पत्रकार दिनकर शिंदे, पर्यवेक्षक दीपक देशपांडे, विजय भोसले आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

केवळ हिरवळ निर्माण होणार नाही, तर हवेतील प्रदूषण कमी होणे, उन्हाळ्यातील उष्णता नियंत्रित राहणे, नागरिकांना शुद्ध हवा मिळणे आणि जैवविविधतेत वाढ होणे अशा अनेक स्तरांवर लाभ होणार आहेत.आपल्या मनोगतात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, ''वृक्षलागवड ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित नसून, ती सातत्याने राबविण्याची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्विकारली, तर हरित बीडचे स्वप्न नक्कीच साकार होईल.''या कार्यक्रमास राष्ट्रीय महामार्गाचे उपविभागीय अभियंता श्री. राजेंद्र भोपळे, नगरपालिका सहआयुक्त श्री. संभाजी वाघमारे, नगर परिषद मुख्याधिकारी श्री. शैलेश फडसे तसेच जिल्हा प्रशासनातील अधिकारी–कर्मचारी आणि श्री. योगेश क्षीरसागर यांची देखील उपस्थिती होती. तसेच स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. पुढील काही महिन्यांत संपूर्ण शहरात ही वृक्षलागवड मोहीम राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे.

---------------

### मिळालेल्या पदाचा उपयोग

त्यांच्या जीवन आणि राहणीमानाचा दर्जा कसा उंचावता येईल याबाबत इथून पुढे प्रयत्न करेल असे आश्वासन दिले. अध्यक्षीय समारोप करताना स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी प्रा.डॉ.नरसिंगे व विजय कचरे यांचे अभिनंदन करीत मिळालेल्या पदाचा विद्यार्थ्यांसाठी समाजासाठी तसेच राष्ट्राच्या उन्नतीसाठी उपयोग करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्मारक समितीचे उपाध्यक्ष रामेश्वर खाडे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा.मिलिंद ढगे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्मारक समितीचे आदित्य कदम, संजय साळवे राजकुमार साळवी, सुनिल नरसिंगे यांनी परिश्रम घेतले.

---------------

### मेंढपाळाचा खून करणाऱ्या

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला दिल्याने पोलीस निरीक्षक शिवाजी बंटीवाड, उपनिरीक्षक श्रीराम खटावकर व त्यांच्या पथकाने दिनांक आठ सप्टेंबर रोजी शिरूर, चकलांबा हद्दीत रानमाळात शोध घेत असताना हा आरोपी आनंदगाव शिवारात फिरत असल्याची माहिती मिळाल्यावरुन श्रीराम खटावकर व त्यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी त्याला शोधून ताब्यात घेतले. त्याला पुढील तपासण्यासाठी पाटोदा पोलिसांच्या ताब्यात दिले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड बाळू सानप ,अशपाक सय्यद, मनोज परजणे, अर्जुन यादव ,अश्विन सुरवसे, सुनील राठोड ,सिद्धेश्वर मांजरे आदींनी केली.

---------------

### ज्येष्ठ स्वतंत्र सेनानी सर्जेराव

विरोधात आणि इंग्रजांच्या विरोधातही लढा दिलेला आहे.हा इतिहास पुढील पिढीला या स्मृतिस्थळामुळे माहित होईल. याप्रसंगी माजी आ. भीमराव धोंडे यांनीही ज्येष्ठ स्वतंत्र सैनिक सर्जेराव दादांच्या कार्यालयातला उजाळा दिला.माजी आ. साहेबराव दरेकर यांनी स्वातंत्र सैनिकांच्या इतिहासात सर्वांच्या समोर मांडला. आजच्या पिढीने या स्वातंत्र्यसैनिकांचा त्याग लक्षात घ्यावा ज्या ज्या वेळी आपण किन्ही गावाला यायचं त्यावेळी सर्जेराव पाटील यांचे विचार आपण आवर्जून ऐकायचं त्यांच्याशी बोलायचं असेही दरेकर म्हणाले. यावेळी माजी आ. बाळासाहेब आजबे, आदिनाथ सानप, अण्णासाहेब चौधरी, हनुमंत थोरवे, डॉ.मधुकर हंबर्डे, देविदास धस, संजय गाढवे,बाळासाहेब निकम,रमजान तांबोळी, सतीश शिंदे, सुनील नाथ, शहाजी रणसिंग, रमेश नेमाने, गणेश घाडगे, संजय निकम, सुभाष निकम, रामचंद्र पवार,डॉ.मंगेश खटावकर,डा आनंद पाटील,अशिष वाघ, जालिंदर देशमुख, वसंत लवांडे,तुषार येवले, हिंगे सर आदि उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी केले. यावेळी किन्ही गावातील मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

---------------

## पान १ वरून...

### ६० हजार शेतकरी

समोर आले आहे. कुटुंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ देण्याचा निकष लागू करण्यात आला आहे. त्याचा फटका राज्यातील ६० हजार शेतकऱ्यांना बसला आहे. त्यांच्या बँक खात्यात योजनेचा २० वा हप्ता जमा झाला नसल्याचे वृत्त समोर आले आहे. हा केंद्र सरकारचा फतवा अजबच म्हणावा लागेल, अशी टीका आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

-----------

### राष्ट्रवादी काँग्रेससह १५

आहे. मात्र हा पक्ष राज्यातील राष्ट्रवादीच्या दोन गटांपैकी कोणता आहे, याबाबत आयोगाकडून स्पष्टता झालेली नाही. निवडणूक आयोगाने २०१९ पासून कोणत्याही निवडणुकीत भाग न घेतलेल्या पक्षांना उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. यापैकी काही पक्षांनी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसमोर (सीईओ) आपली भूमिका स्पष्ट केली, परंतु बहुतेक पक्ष नोटीसला उत्तर देण्यासाठीही पोहोचले नाहीत. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ अंतर्गत सूचीबद्ध पक्षांना अनेक सुविधा दिल्या जातात. परंतु सतत निष्क्रिय राहिल्यास त्यांची मान्यता आणि फायदे काढून घेतले जाऊ शकतात. गेल्या महिन्यात आयोगाने बिहारमधील अनेक निष्क्रिय पक्षांना यादीतून वगळले होते. त्यानंतर लवकर या १५ पक्षांच्या भविष्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. या सर्व निष्क्रिय पक्षांविरुद्ध राज्यातील निवडणूक आयुक्तांच्या कार्यालयाने अहवाल तयार करून तो केंद्रीय निवडणूक आयोगाकडे पाठवला आहे.

---------------

### सीपी राधाकृष्णन देशाचे नवे

घोषित करण्यात आली. सीपी राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीची ४५२ मते मिळाली, तर इंडिया ब्लॉकचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांना पहिल्या पसंतीची फक्त ३०० मते मिळाली. विरोधी पक्ष आपल्या खासदारांना एकजूट ठेवू शकला नाही. एनडीएकडे एकूण ४२७ खासदार होते. जगनमोहन रेड्डी यांच्या पक्षाच्या वायएसआर काँग्रेसच्या सर्व ११ खासदारांनी एनडीए उमेदवाराच्या बाजूने मतदान केले तर ही संख्या ४३८ पर्यंत पोहोचते. परंतु सीपी राधाकृष्णन यांना एकूण ४५२ मते मिळाली. म्हणजेच १४ विरोधी खासदारांनी एनडीए उमेदवाराच्या बाजूने क्रॉस–व्होटिंग केले असल्याचे दिसून येत आहे.

-----------

### परळीत अल्पवयीन

अत्याचार करण्यात आले.याच गल्लीत राहणाऱ्या चार तरुणांनी मिळून हे कृत्य केल्याचे समोर आले आहे. यापैकी दोन आरोपींनी मुलीला पकडून ठेवत इतर दोघांना बलात्कार करण्यास मदत केली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.या माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनेप्रकरणी चार आरोपींविरुद्ध संभाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींची नावे मेहफुज कुरेशी आणि रेहान सय्यद (दोघेही रा. बरकतनगर, परळी, जि. बीड) अशी असून इतर दोन आरोपी कुरेशीचे मुले असल्याचे सांगितले जात आहे.या सर्व आरोपींविरुद्ध कलम ६४(१), ६५(१), ७०(२), ३(५) सह पोक्सो ॲक्ट २०१२ च्या कलम ४, ६, ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केली असून पुढील तपास संभाजीनगर पोलीस करत आहेत. काही दिवसांपूर्वीच घडलेले रेल्वे स्थानकावरील अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराचे प्रकरण संपूर्ण राज्यभर चर्चेत असतानाच पुन्हा अशाचे प्रकारचे संतापजनक कृत्य समोर आल्याने मोठी खळबळ उडाली आहे.अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या अशा घटना वारंवार घडत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

------------

### गेवराईतील उपसरपंचाची डोक्यात

झालेल्या उपसरपंच यांचे नाव आहे. सोमवारी गोविंद बरगे, रा. लु. मसला तालुका गेवराई येथून मित्राला भेटण्यासाठी बार्शी (जि सोलापूर) येथे ,चार चाकी वाहन घेऊन गेले होते. मात्र, मंगळवार ता. ९ रोजी सकाळी दहा वाजण्याचे सुमारास बरगे यांचा सासुरे गावच्या शिवारात कारमध्ये मृतदेह आढळून आल्याची माहिती आहे. दरम्यान, त्यांनी पिस्तुलातून गोळी झाडून आत्महत्या केल्याची चर्चा होत असून, कोणत्या कारणास्तव त्यांनी एवढ्या टोकाचे पाऊस उचलले, या संदर्भात काहीच स्पष्ट झाले नाही.

------------

### कुणबी दाखले देण्याची प्रक्रियी सुरु

कारवाई मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमिती अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. सुमारे ४०० ते ४५० गुन्ह्यांवरील कारवाई मागे घेतली जाणार आहे. त्यामुळे मराठा आंदोलकांना मोठा दिलासा मिळेल, असा दावाही मंत्री विखे पाटील यांनी केला. ते म्हणाले, ''प्रत्येक सोमवारी जिल्हाधिकारी आणि पोलिस अधिकाऱ्यांसह बैठक घेण्यात येईल. या बैठकीची माहिती मंगळवारी प्रत्येक मंत्रिमंडळ बैठकीत दिली जाईल. तसेच, मराठा आरक्षण आंदोलनात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना नोकरी आणि आर्थिक मदत देण्याचे आदेशही जारी करण्यात आले आहेत. हे आदेश राज्य सरकारने उपसमितीच्या शिफारसीनुसार लागू करण्यात येतील.'' असेही मंत्री विखे यांनी सांगितले. या सर्व प्रकारानंतर ओबीसी समाजातील काही नेत्यांनी शासन निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. यावर विखे पाटील यांनी स्पष्ट सांगितले की, छगन भुजबळ यांना भेटून गैरसमज दूर केला जाईल. त्यामुळे शासन निर्णय मागे घेण्यात येणार नाही. तसेच मुख्यमंत्री यांनी ओबीसी समाजासाठी स्वतंत्र समिती गठीत केली आहे. त्यामुळे यावर सर्व भागधारकांशी चर्चा करून निर्णयाची योग्य अंमलबजावणी केली जाणार आहे, असे ते म्हणाले.

------------

### गेवराईत हाके समर्थका

किशोर कोकरे (रा.आगर नांदुर), सुनिल ढाकणे (रा.वडगाव ढोक), ऋषीकेश मुकूटराव, आकाश कोकरे, दत्ता शेंडगे, महारूद्र मुकूटराव (रा.बागपिंपळगाव), सुनिल माळी, केशव माळी रा.बेलगाव वस्ती, बाबा पिसाळ (रा.गेवराई), बाबा मोटे (रा.शिंदेवाडी), अशोक कोकरे (रा.विठ्ठलनगर,) गजानन कोळेकर (रा.रेवकी), गजानन गोरे (रा.शिवाजीनगर गेवराई), किरण सुतार (रा.साठेनगर गेवराई) आणि ऋषीकेश बांगर (रा.रेवकी) या १७ जणांविरूध्द कलम २२३, १८९(२), २८५ भारतीय न्याय संहितासह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोउपनि खोत करीत आहेत.

--------------

### जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाविरोधात

स्वाक्षरींचे निवेदन दि.२ सप्टेंबर रोजी जिल्हा प्रशासनाला देण्यात आले होते. त्याचबरोबर आंदोलन कशा स्वरूपाचे राहिल ? याबाबत देखील दि.८ सप्टेंबर रोजी रितसरङ्गङ्गनिवेदन कर्मचाऱ्यांनी दिले होते. मग निवेदने देऊनही आंदोलनाची माहिती प्रशासनाला होत नसेल तर लोकांनी, संघटनांनी दिलेली निवेदने जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत जात नाहीत का ? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होऊ लागला आहे. बीड जिल्हा प्रशासनातील वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांनी आज लेखनी बंद आंदोलन सुरू केले आहे. महसुल कर्मचारी संघटना, जिल्हा ग्राम महसूल अधिकारी मंडळ संघटना, वर्ग ४ कर्मचारी संघटना, वाहन चालक संघटना व कोतवाल (महसूल सेवक) संघटनेचे सर्व कर्मचारी या संपात सहभागी झाले आहेत. जिल्ह्यातील निलंबित कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेण्याबाबत यापुर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अनेकदा निवेदने देण्यात आली. परंतू श्रीमती जयश्री टाक, अभिजीत दहिवाळ, संतोष हंगे यांचे निलंबन मागे घेण्याबाबत अद्याप कारवाई झालेली नाही. त्यांना ज्या कारणांमुळे निलंबीत करण्यात आलेले आहेत. ती कामे त्यांच्याकडे नाही. असा दावा कर्मचारी संघटनेने केलेला आहे. प्रशासनाला वेळ देवून आणि जिल्हाधिकारी यांच्यासोबत चर्चा करूनही निलंबन मागे न घेतल्यामुळे आज १२०० कर्मचारी सामुहिक रजेवर गेले आहेत.उद्या दि.१० सप्टेंबर पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचे कर्मचाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर एम.एस.चौरे, बा.बा.बडे, राहुल शेटे, मुंडे बी.के., पी.सी.तांबडे, हर्षद कांबळे आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

------------

### सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या

गप्पा मारणारा माणूस मात्र आता दिसत नाही. पारावर बसला तर एकमेकांकडे संशयाने पाहताना दिसतो, असे विचित्र चित्र सध्या बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये पहावयास मिळत आहे. बीडमध्ये मागील काळात मराठा आंदोलकांनी अनेक लोकप्रतिनिधींच्या घरावर हल्ले केले, जाळपोळ केली. त्यानंतर काही काळाने वातावरण शांत झाले मात्र त्यातही अधून मधून एकमेकांच्या जातीविषयी सोशल मीडियाच्या माध्यमातून द्वेष पेरण्याचे काम सुरूच असलेले दिसून येते. त्यातच मस्साजोग येथील घडलेली दुर्दैवी घटना आणि तेथून पुढे एकमेकां विरोधात सोशल मीडियाच्या माध्यमातून पसरलेले द्वेष याला अधिक व्यापकता आली. खरे पाहिले तर रोज एकमेकांसोबत राहणारे देखील आता एकमेकाविषयी संशयाने पाहू लागले आहेत. त्यातच आता मराठा समाजाला आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला, मात्र त्यातही पुढे राजकारण सुरू झाले. ओबीसी समाजाने या आरक्षणाला विरोध करत मराठा समाजाला आरक्षण द्या परंतु आमच्या मधून नको म्हणून ओबीसीने बैठका आणि मोर्चे सुरू केले आहेत. त्याचे लोन सर्वाधिक बीड जिल्ह्यातच पोहोचले गेले आहे. मागील दोन दिवसांपूर्वी भोगलवाडी तालुका धारूर येथे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मोठा मेळावा घेतला, मात्र त्यापूर्वी पोखरी येथील मनोज जरांगे यांचे लावलेले बॅनर काही माथेफिरूंनी पाडले. हा वाद थांबत नाही तोच भोगलवाडी येथे कार्यक्रमानिमित्त लावण्यात आलेले स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे बॅनर हटवून त्या ठिकाणी मनोज जरांगे यांचे बॅनर लावले गेले. यावरून वाद निर्माण झाला मात्र हा वाद कसातरी निपटल्यानंतर मंगळवारी धारूर तालुक्यातील आंबेवडगाव या ठिकाणी काही विध्वंसक वृत्तीच्या आणि जातीत तेढ निर्माण व्हावी म्हणून जरांगे पाटील यांचे बॅनर लावताना त्यावर अक्षपार्ह मजकूर लिहिला. यामुळे पुन्हा तणावाचे वातावरण निर्माण झाले. वादग्रस्त मजकूर लिहिणाऱ्या अवलादीना केज पोलिसांनी कायद्याचा धाक दाखवला, परंतु अशीच परिस्थिती राहिली तर परिस्थिती बिघडायला वेळ लागणार नाही.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. १० सप्टेंबर २०२५ ३



माजलगावः मिशन जरेवाडी सन २०२४-२५ मध्ये माजलगाव शहरातील जि.प.प्रा.शा.इंदिरानगर ऊर्दू माजलगावचे मुख्याध्यापक शेख युनूस सर व सर्व शिक्षकांनी केलेल्या उत्कृष्ट कार्य बदल दि ०९ सप्टेंबर मंगळवार रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्या शुभहस्ते मुख्याध्यापक शेख युनूस सर यांचा सर्वोत्कृष्ट शाळा सन्मानपत्र देवून सन्मान करण्यात आला.

# टेंबे गणपतीला भावपूर्ण वातावरणात निरोप

## मानाचे टेंबे सहभागी - १२५ वर्षांची ऐतिहासिक परंपरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

**सवाशे वर्षांची परंपरा असलेला व नवसाला पावणारा गणपती म्हणून राज्यभर ओळख असणाऱ्या टेंबे गणपतीला भावपूर्ण वातावरणामध्ये ढोल ताशाच्या गजरामध्ये दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी निरोप देण्यात आला.**

शहरातील टेंबे गणेश मंडळाला सव्वाशे वर्षांची परंपरा असून यंदाचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने मंडळाच्या वतीने गणेशोत्सव काळात भरगच्च अशा विवीध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. गणपती दर्शनाला राज्यासह मराठवाड्यातुन भाविकांनी गर्दी केली. भाविक - भक्तांकडुन टेंबे गणपतीला पावणेदोन किलो चांदीचे दागिने अर्पण करण्यात आले तर पाच दिवसांमध्ये सोन्या - चांदीचे मोदक, दूर्वा श्रीचरणी अर्पण केल्या. आमदार प्रकाश सोळंके यांचे वतीने बांधकामाकरिता पाच लाख रूपयांचा निधी दिला तर खा. अजित गोपछडे यांचे वतीने सुसज्ज अशा सभागृहासाठी पन्नास लाख रूपयांचा निधी देण्याची घोषणा केली. विसर्जन मिरवणुकीतील शाहिस्तेखानाची फजिती हा ऐतिहासिक तर जगन्नाथाचा रथ,





ऑपरेशन सिंदूर या धार्मिक देखाव्याने शहरवासीयांचे लक्ष वेधले. विसर्जन मिरवणुकीत मंडळाचे अध्यक्ष अनंतशास्त्री जोशी, विश्वनाथ जोशी, रविंद्र जोशी, अ‍ॅड. बी. आर. डक, अमोल मुळी, शिवाजी देशमुख, बाळकृष्ण जोशी, किशोर जोशी, उदय जोशी, सचिन बजाज यांचेसह भाविक मोठ्या संख्येने सहभागी होते तर चौका - चौकांमध्ये भक्तगणांसाठी खिचडी, फराळ, फळवाटप विवीध मंडळाने व सामाजिक संघटनांनी केले. यावेळी पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला.

## थोडक्यात...

### पी.व्ही.पी. कॉलेज ऑफ फार्मसीला उत्तम श्रेणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील पी.व्ही.पी. कॉलेज ऑफ फार्मसी ला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या देखरेख समितीने अलीकडेच भेट दिली. या भेटीत महाविद्यालयाचे बाह्य परीक्षण करण्यात आले. समितीने शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, अत्याधुनिक प्रयोगशाळा व उपकरणे, प्रशासकीय कामकाज, विद्यार्थ्यांशी संवाद, नवीन उपक्रम, कार्यशाळा, गुणवंत विद्यार्थी तसेच विविध नामांकित कंपन्यांमधील विद्यार्थ्यांची निवड या सर्व बाबींचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राबविलेल्या उपक्रमांचे समितीने विशेष कौतुक केले. प्राचार्य प्रा. संदीप तांदळे व सर्व प्राध्यापकांनी समितीसमोर महाविद्यालयाची शैक्षणिक व प्रशासकीय माहिती सादर केली. या परीक्षणानंतर पी.व्ही.पी. कॉलेज ऑफ फार्मसीला ''उत्तम श्रेणी'' प्राप्त झाली.या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भारतभूषण क्षीरसागर, सचिव डॉ. योगेशभैया क्षीरसागर, दीपाताई क्षीरसागर, सारिकाताई क्षीरसागर यांनी आनंद व समाधान व्यक्त केले.या यशामध्ये सर्व प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचा मोलाचा सहभाग राहिला.

### तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

क्रीडा व युवक संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय बीड यांच्या वतीने दि.०८ सप्टेंबर २०२५ रोजी पाटोदा तालुका स्तरीय कुस्ती स्पर्धा जय हनुमान व्यायाम शाळा राहुल आवारे तालीम आखाडा येथे पार पडल्या. या क्रीडा स्पर्धेमध्ये श्री.केशवराज विद्यालय, दासखेड चे दोन विद्यार्थी जिल्हास्तरावरती पात्र झाले. यामध्ये १४ वर्षे वयोगटांमध्ये भोपळे ओंकार गोरख ३७ किलो वजन गटात प्रथम क्रमांक व जिल्हा स्तर निवड त्याचप्रमाणे १७ वर्षे वयोगट मोरे ओंकार राजेंद्र ६० किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल दोन्ही खेळाडूंचे शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक श्री. मोहोळकर सर व क्रीडाशिक्षक श्री.उबाळे सर ,श्री.धोंडे सर तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,समस्त दासखेड ग्रामस्थ यांच्या वतीने हार्दिक हार्दिक अभिनंदन केले व पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने उपस्थित रहा -कॉ.प्रभाळे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक सरकारने अधिवेशनामध्ये मंजूर केले असले तरी जनतेमधून त्याला प्रचंड विरोध होत आहे. अनेक कायदे अस्तित्वात असताना देखील राज्य सरकारने फक्त आणि फक्त सरकारच्या विरोधात कोणी आंदोलन मोर्चे करू नयेत सरकार सुरक्षित रहावे या उद्देशाने सदरील विधेयक मंजूर केलेले आहे. उजव्या विचारसरणीचे सरकार अस्तित्वात असल्याने



जनतेची सुरक्षा कमी आणि आपली विचारधारा लोकावरती थोपवण्याचे काम सरकार करत आहे. या विधेयकाच्या माध्यमातून जो खरे बोलेल, सरकारला प्रश्न विचारेल अशांना शहरी नक्षलवादी घोषित करणे सरकारला सोपे जाईल व जन सुरक्षा या गोंडस नावाखाली लोकसहानुभूती कशी मिळेल याचा यामध्ये धोका नाकारता येत नाही. दिल्लीमध्ये शेतकऱ्यांनी सतत एक वर्ष आंदोलन करून सरकारला काळे कायदे रद्द करावे लागले. भविष्यात असे आंदोलने उभे राहू नाही याची खबरदारी म्हणून महाराष्ट्र राज्य सरकारने प्रयोग महाराष्ट्रामध्ये केल्याचे दिसून येत आहे. शेतकरी, बेरोजगार आणि मोठ्या प्रमाणावर भरती केलेले कंत्राटी कामगार सरकार विरोधात भविष्यामध्ये आंदोलन मोर्चे करणार याचा अंदाज घेऊन सरकारने ही विधेयक पारित केलेले आहे.

आज दिनांक १० सप्टेंबर बुधवार रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता महाविकास आघाडी चे सर्व घटक पक्ष, राष्ट्रवादी शरद पवार गट, राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी पार्टी, डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया, दलित पँथर व महाविकास आघाडी सोबत असलेल्या सर्व सामाजिक संघटना यांचा या आंदोलनामध्ये सहभाग असणार आहे. तरी सर्व राजकीय पक्ष व जागरूक नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी कॉम्रेड भाऊराव प्रभाळे यांनी केले आहे.

# अंबाजोगाई पिपल्स बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा १३ सप्टेंबरला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन शनिवार दि १३ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या वार्षिक सर्वसाधारण सभेस बँकेच्या सर्व सन्माननीय सभासद व ग्राहकांनी उपस्थित राहण्याचे अवाहन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी , उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी व मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे.**



अठ्ठावीस वर्षापूर्वी अंबाजोगाई शहर व येथील नागरिकांची आर्थिक गरज लक्षात घेवून केवळ अंबाजोगाई शहरासाठी राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची सुरुवात केली होती. आज ही बँक आपल्या ग्राहकांच्या विश्वास व आर्थिक बळाच्या जोरावर १८ शाखा व दोन विस्तारित शाखांच्या माध्यमातून नागरिकांना सेवा देत आहे . आज केवळ अंबाजोगाई शाखेत ३८ हजाराच्या वर ग्राहक व खातेदार आहेत तर बँकेच्या सर्व शाखांचे मिळून एक लाखाच्या वर ग्राहक आहेत . हे सर्व ग्राहक बँकेवर विश्वास ठेवून आपला व्यवहार या बँकेत करत आहेत. बँकेच्या वतीने हजारो गरजवंत सुशिक्षित बेरोजगार , लहानमोठे व्यावसायिक, व्यापारी, हातगाडी व फेरीवाले यांना त्यांचा व्यवसाय व कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कर्जाच्या स्वरूपात मदत करण्यात येत आहे . तसेच बँक वेळोवेळी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात देखील अग्रेसर असते. बँकेने ठेविचा ६०० कोटींचा टप्पा ओलांडत वार्षिक उलाढालीत १००० कोटींचा टप्पा पार केला आहे. या वार्षिक आर्थिक उलढालीचा लेखाजोखा मांडून तो मंजूर करून घेण्यासाठी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि १३ सप्टेंबर २०२५ ,शनिवार रोजी संध्याकाळी ६:०० वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आली आहे . बँकेच्या वार्षिक सभेनंतर लगेच प्रीती भोज सभासदांसाठी आयोजित करण्यात आला आहे. याचा देखील आस्वाद घेण्याचे तसेच बँकेच्या २९ व्या आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेस सर्व सभासद मंडळींनी उपस्थित राहून बँकेस सहकार्य करावे असे आवाहन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी , उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तसेच सर्व सन्माननीय संचालक मंडळ तथा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे.

# सहशिक्षिका सुनिता ढाकणे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

बीड । प्रतिनिधी

डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ हा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इट केंद्र वडगाव गुंदा ता.जि. बीड येथे कार्यरत असलेल्या सहशिक्षीका सुनिता माधवराव ढाकणे यांना प्रदान करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे झालेल्या शानदार कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला. देण्यात आला.या वेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, माजी आमदार उषाताई दाराडे, पत्रकार वैभव स्वामी, वसंत मुंडे तसेच शेख ताहेर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुनिता माधवराव ढाकणे या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिल्हा परिषद शाळेमध्ये सहशिक्षीका म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.त्यांचे मुळ गाव गेवराई तालुक्यातील शेकटा असून



शेकटा येथेही अनेक वर्ष त्यांनी सहशिक्षीका म्हणून कार्यभार सांभाळलेला आहे. तसेच गेवराई तालुक्यातील तलवाडा, साक्षाडपिंप्री अशा विविध शाळेवर त्यांनी सहशिक्षीका म्हणून काम केले असून अनेक विद्यार्थी घडवण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. शिक्षणाप्रती प्रचड गोडी असलेल्या ढाकणे मॅडम यांनी अनेक विद्यार्थ्यांना मौलीक मार्गदर्शन केलेल आहे. त्यांच्या मनमिळावून स्वाभावामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांना त्या आपल्याशा वाटतात. त्यांच्या याच कार्याची चुनुक पाहता त्यांना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण आदर्श शिक्षक पुरस्काराने दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे झालेल्या शानदार कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला. ढाकणे मॅडम यांना पुरस्कार मिळाल्याने त्यांचे माहेर मिरकाळा, सासर शेकटा परिसरातून व नातेवाईकांकडून त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# माध्यमिक विद्यालय तलवाडा शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा

तलवाडा । प्रतिनिधी

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय तलवाडा शाळेत शिक्षक दिन दिं.९ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. दहावी च्या विद्यार्थ्यांनी शाळेचे कामकाज उत्तम रित्या पार पाडले. त्यांनी सर्वप्रथम परिपाठ घेतला त्यामध्ये मुख्याध्यापकाची भूमिका पायल मिसाळ ,व पर्यवेक्षक म्हणून शेख मिसबा, यांनी पार पाडली इयत्ता दहावीचे विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी शिक्षकांची भूमिका बजावत दिवसभर शिक्षण देण्याचे काम केले. नंतर झालेल्या कार्यक्रमात सर्व शिक्षक वृंदाचा सत्कार करून त्यांनी आपणास आज शिकवताना आलेल्या अडचणी



नमूद केल्या शिक्षकाविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक अशोक तौर, प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे पर्यवेक्षक लाड सर उपस्थित होते. कार्यक्रमाला जाधव सर ,सगळे सर, पवार सर , पाठक सर, लव्हाळे सर, वावरे सर , डोंगरे सर, कोकाट सर, श्री पंडित सर श्री कावळे सर श्री नाथा कावळे , दिपक लाड सर, शेजुळ सर, ठोंबळे सर, मुधोळ सर, कांबळे सर , कदम सर ,आणि शिक्षक वृंद उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. शेख अदिबा हीने केले शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. राजनंदनी वावरे हीने केले कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना अल्प उपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# सभापती जयदत्त नरवडे यांना पितृशोक

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सुलतानपुर (माळेवाडी) येथील प्रगतशिल शेतकरी म्हणुन ओळख असलेले सुभाषराव नरवडे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने दि.०९ सप्टेंबर मंगळवार रोजी सकाळी ०८:०० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील हॉस्पिटलमध्ये निधन झाले.



सुभाषराव नरवडे हे प्रगतशील शेतकरी तसेच मनमिळावु स्वभावाचे मितभाषी व्यक्तीमत्व असल्याने पंचक्रोषित परिचीत होते.त्यांच्या पार्थीव देहावर सुलतानपुर (माळेवाडी) येथे सायंकाळी ५:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पाच मुले,सुना,नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे यांचे ते वडील होत.

# अमोलक संस्थेला कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार

आष्टी । प्रतिनिधी

अमोलक संस्थेला विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष मोकुळदास मेहर, कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी, उपाध्यक्ष अनिल झाडमुथा, उपाध्यक्ष बिपिन भंडारी, मंत्री विनोद बलदोटा, कार्यकारी मंडळाचे संचालक प्रफुद्धपोखरणा योगेश चानोदिया, संतोष गांधी, अजय चोखेले, ललित कटारिया, संजय कोठारी, डॉ. मलगट, तसेच अमोलक परिवारातील सर्व प्राचार्य डॉ. जवाहरलाल भंडारी, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी नवनाथ पडोळे विद्यालयाचे प्राचार्य मथाजी शिकारे, ही फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य महेश मस्के, बी फार्मसीमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सय्यद, इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य खंदारे, शोमचंद ललवाणी मोहसीनपठाण प्रकाश सरडे, आनंद पोखरणा डॉ. आशिष कटारिया, निलेश गांधी, सुशील पटवा, नितीनशिंगवी, संदीप मळगट, शैलेश गांधी, अतुल बोरा, दीपक गुगळे सर, महेंद्र पेटकर सर, सचिन घोरडिया, आकाश चोरडिया तसेच इतर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्वीकारला. यावेळी शिक्षण उपसंचालकों,



ज्योती सोळंकी जीव मंगल प्रतिष्ठानचे पुण्याचे अध्यक्ष डॉ. कल्याण गंगवालजैन कॉन्फरन्सर्वभूतपूर्व राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश घोरडिया, भूतपूर्व राष्ट्रीय अध्यक्ष पारस मोदी, सुनील चोपडा डॉ. अशोकपमारिया मोहनलाल लोढा, रुचिरा सुराणा, विगल बाफना, रिथा जैन तसेथ प्रमुख अतिथी प्रकाश गदिया, दिलीप सोनिगरा सुभाष ललवाणी, शोभा बंब, प्रा. सुरेखा जी कटारिया इत्यादी उपस्थित होते आकुर्डीनिगडी पुणे येथे ग. दि माडगूळकर ऑडिटोरियम हॉलमध्ये हा पुरस्कार वितरण सोहळा अतिशयउत्साहात संपन्न झाला अशी माहिती श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने देण्यात येत आहे श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ ही संस्था बीड जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात शैक्षणिक वसामाजिक कार्य उत्कृष्ट पद्धतीने चालवत असल्यामुळे आणि संस्थेमध्ये सर्व शैक्षणिक विभागामार्फतज्ञानदानाचे पवित्र कार्य अविरत चालू आहे. तसेच ही शैक्षणिक संस्था सामाजिका क्षेत्रात भरभरून कार्यकरीत आहे जसे की सर्व रोग निदान शिबिर, रक्तदान शिबिर मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरअसे अनेक प्रकारचे सामाजिक कार्य संस्थेमार्फत अविरत पणे चालू असता पुरस्कार वितरणसोहळ्याच्या प्रसंगी बोलताना यांनी शाकाहाराचे महत्त्व पटवून दिले.



# हॉलीबॉल सांघिक खेळामध्ये वसुंधरा विद्यालयाचे घवघवीत यश

**आष्टी । प्रतिनिधी**

शालेय तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन हंबर्डे महाविद्यालय आष्टी ठिकाणी करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये हॉलीबॉल या सांघिक खेळ प्रकारामध्ये प्रशालेचे घवघवीत यश तालुकास्तरीय अंतिम स्पर्धेचा सामना वसुंधरा माध्यमिक विद्यालय आष्टी व पिंपळेश्वर विद्यालय आष्टी यामध्ये रंगला वसुंधरा प्राथमिक विद्यालयाने या सामन्यात २-० ने सामन्यात आघाडी घेत प्रथम क्रमांक पटकावला.

तालुकास्तरीय हॉलीबॉलया स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी संघाची निवड झाली या झालेल्या स्पर्धेमध्ये वसुंधरा विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी चांगला खेळ करत पिंपळेश्वर विद्यालयाचा दारुण पराभव केला असून या सर्व सहभागी खेळाडूंचे शिवराज सोले,यश लगड,पवन गरसुळे, सौद सय्यद,उत्कर्ष डोके, सार्थक पवार,आदर्श वहाटूळे,आयुष शिंदे, आदित्य पोकळे, इंद्रजीत दळवी,समर्थ जगताप, श्रेयस दळवी या सर्वांचे क्रीडाशिक्षक सर्व शिक्षक मुख्याध्यापक व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री मनोरंजन धस साहे यांनी खूप खूप अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# 'ओबीसी विरोधी हैद्राबाद गॅझेट जीआर तत्काळ रद्द करा व ओबीसींच्या मागण्या मान्य करा'७

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील ओबीसी बांधव एकत्र येऊन उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना निवेदनाद्वारे हैद्राबाद गझेट जी. आर. रद्द करण्याची आणि ओबीसी बांधवांच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी निवेदन केली आहे.निवेदनामध्ये ओबीसी विरोधी हैद्राबाद गझेट जी.आर. तात्काळ रद्द करा., ओबीसी विरोधी न्यायमूर्ती शिंदे समिती रद्द करा, न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीने शोधलेल्या बोगस ५८ लाख कुणबी नोंदी रद्द करुन वितरीत केलेल्या कुणबी जात प्रमाणपत्रांची पारदर्शक चौकशी करा, महाराष्ट्र राज्याची जातिनिहाय जनगणना करुन ओबीसींची लोकसंख्या जाहीर करा,कुणबी जात प्रमाणपत्रांची पारदर्शक चौकशी करा. तामिळनाडू सरकारप्रमाणे आरक्षणाची ७५% मर्यादा वाढवून ओबीसी एस.सी. एस.टी.प्रवर्गाना लोकसंख्येप्रमाणे आरक्षणाची अंमलबजावणी करा., ओबीसींना संपूर्ण भारतात लोकसभा व विधानसभेत मतदार संघ आरक्षीत करा., मंडल आयोगाची



ओबीसींना कायदेशिर अंमलबजावणी करुन सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक न्याय द्या., ओबीसींच्या लोकसंख्येप्रमाणे आर्थिक व शैक्षणिक तरतुद करा., ओबीसी विद्यार्थ्यांना महामंडळ निर्देशांकांप्रमाणे शिष्यवृत्ती देऊन प्रत्येक तालुकास्तरावर शासकिय वस्तीगृह सुरु करुन अत्याधुनिक सुविधा द्या., ओबीसी कम्रचाऱ्यांच्या विभागांतर्गत रिक्त पदे त्वरीत पदोन्नतीतून भरा., वरील मागण्या प्रमाणे ओबीसी विरोधी हैद्राबाद गॅझेट जी.आर. तात्काळ शासनाने रद्द करण्यात यावा. नसता लोकशाही पध्दतीने अंदोलन करण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी शासनावर वर राहिल असा निवेदनाद्वारे मागण्या केल्या आहेत यामध्ये प्रतिलीपी :मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य मुंबई,मा. ना. मुख्यमंत्री साहेब, महाराष्ट्र राज्य मुंबई, मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड यांना देण्यात आले.या निवेदनावर पुढील प्रमाणे सह्या आहेत.छगनराव मुळे, प.स.सभापती अनिल जायभाय,समता परिषदेचे तालुकाध्यक्ष दिगंबर नाईकनवरे,माजी सरपंच आनंद राऊत,सुर्वसे पाचंग्री, विनोद राऊत, माजी सरपंच हनुमान शेलार, सभापती रामश्वर गोरे, गणेश खाडे (माजी सैनिक )संपत नागरगोजे,शेलार कृष्णा, सुदर्शन गोरे, गणेश शेवाळे,सानप गणेश,काळुशे पियुस,आबा गर्जे, संतोष नाईकनवरे, खंडागळे विष्णू, विक्रम राऊत, श्रीधर राऊत, नाईकनवरे दत्तोबा, अंकुश अशोक, आदींच्या सह्या आहेत.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-५९० दिनांक-२८/०८/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती शेख हारुण अब्दुल रहीम रा.चिंचखेड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख हारुण अब्दुल रहीम | स्वत: | ०१/०७/१९७३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२८-८-२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

cmyk




# दर १२०० रुपये आणि उत्पादन खर्च २५०० रुपये!

## कांदा उत्पादक शेतकरी संघटना आक्रमक, राज्यभर करणार फोन आंदोलन

पुणे : राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या अडचणीत आहेत. कारण कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. दरापेक्षा उत्पादन खर्च अधिक होत असल्याचे दिसत आहे. याच मुद्यावरुन महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. १२ सप्टेंबर २०२५ पासून या संघटनेच्या नेतृत्वाखाली राज्यव्यापी ''फोन आंदोलन'' करण्याचा निर्णय घेतला आहे. हे आंदोलन सलग सात दिवस सुरू राहणार असून दरम्यान प्रत्येक कांदा उत्पादक शेतकरी थेट आमदार, खासदार, राज्यातील मंत्री, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच केंद्र सरकारमधील संबंधित मंत्री यांना फोन करून जाब विचारणार आहे. याकामी कांदा संघटनेचे राज्यभरातील पदाधिकारी सुक्ष्म नियोजन करतील अशी माहिती महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी दिली आहे.



गेल्या पाच-सहा महिन्यांपासून शेतकऱ्यांनी आपल्या चाळींमध्ये साठवून ठेवलेला उन्हाळी कांदा उत्पादन खर्चापेक्षा खूपच कमी दराने बाजारात विकला जात आहे. शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ८०० ते १,२०० रुपये एवढेच भाव मिळत असून शेतकऱ्यांना कांदा पिकवण्यासाठी उत्पादन खर्च २,२०० ते २,५०० रुपये प्रति क्विंटल इतका येत आहे. कवडीमोल दराने कांदा विकल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. कांद्याच्या या बिकट स्थितीकडे सरकारकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केला आहे. केंद्र सरकारने तातडीने जास्तीत जास्त कांदा परदेशात निर्यात होण्यासाठी निर्यातीवर अनुदानासह योग्य त्या उपाययोजना करणे, मागील काही महिन्यांमध्ये कमी दरात कांदा विकल्या गेलेल्या शेतकऱ्यांना सरकारने प्रतिक्विंटल १,५०० रुपयाचे अनुदान द्यावे आणि नाफेड व एनसीसीएफचा बफर स्टॉकमधील कांदा स्वस्त किमतीत बाजारात आणू नये अशा प्रमुख मागण्यांसाठी हे राज्यव्यापी फोन आंदोलन केले जाणार आहे.

आंदोलनाची ठळक वैशिष्ट्ये :शेतकरी थेट लोकप्रतिनिधींना फोन करून कांद्याच्या दरवाढीसाठी ठोस भूमिका घ्यावी याची मागणी करणार आहेत. हे आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रभर राबवले जाणार असून हजारो शेतकरी दररोज हजारो फोन करून आपला आवाज लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचवतील. सात दिवसांत शेतकऱ्यांकडून सतत लोकप्रतिनिधींना फोन करून दबाव टाकला जाणार आहे.

या मागण्यांसाठी आंदोलन :

केंद्र व राज्य सरकारने तातडीने कांद्याच्या भाववाढीसाठी हस्तक्षेप करावा. शेतकऱ्यांच्या कांद्याला उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के नफा मिळेल इतका भाव जाहीर करावा. निर्यातबंदी, साठेबंदी किंवा ग्राहकांना कमी भावाने कांदा पुरविण्यासाठी बफर स्टॉक विक्री यासारख्या शेतकऱ्यांना तोटा होईल अशा निर्णयांना त्वरित आळा घालावा.

# कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीचे नियंत्रण



कापूस पिकामध्ये ऑगस्ट महिन्यापासून डोमकळीचा प्रादुर्भाव गुलाबी बोंडअळीच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. त्यामुळे कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. कापूस पिकात पहिल्या अवस्थेमध्ये गुलाबी बोंडअळी फुलांमध्ये शिरते. ही बोंडअळी पाकळ्यांना लाळेद्वारे एकमेकांना जोडून स्वतःला संरक्षणासाठी बंदिस्त करून घेते. प्रादुर्भावग्रस्त फुले ही अर्धवट उमललेल्या गुलाबाच्या कळीप्रमाणे दिसतात. अशा कळ्यांना म्हणजेच डोमकळ्या म्हटले जाते. या डोमकळीच्या प्रादुर्भावामुळे कापूस उत्पादनात घट येते.

गुलाबी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी उपाययोजना : फुले लागल्यानंतर फुलांचे तसेच हिरव्या बोंडाचे निरीक्षण करावे. लागवडीच्या ४५ दिवसानंतर सर्व्हेक्षणासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत. तसेच सामुहिकरीत्या पतंग गोळा करण्यासाठी हेक्टरी २० कामगंध सापळे लावावेत. गुलाबी बोंडअळीग्रस्त डोमकळ्या तोडून आतील अळीसह नष्ट करावे.

जैविक व्यवस्थापन : ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरॅक्टिन १५०० पीपीएम ५० मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारणी करावी. ट्रायकोग्रामाटॉयडी बॅक्ट्री या परोपजिवी गांधीलमाशीने परोपजीवीग्रस्त १.५ लाख अंडी प्रति हेक्टर या प्रमाणात पीक ५०-६० दिवसाचे झाल्यानंतर दोन वेळा वापरावी. कीटकनाशकांची फवारणी : प्रोफेनोफॉस (५० ईसी) २ मि.लि. प्रतिलिटर पाणी किंवा क्विनॉलफॉस (२५ ईसी) २ मि.लि. प्रतिलिटर पाणी किंवा थायोडीकार्ब (७५ डब्ल्युपी) २ ग्रॅम प्रतिलिटर पाणी किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (५ ईसी) १ मि.लि. प्रति लिटर पाणी.

# फळबागेमध्ये हवे भरपूर उत्पादन तर करा संजीवकांचा वापर



पिकाच्या आणि फळबागांच्या भरघोस उत्पादनासाठी विविध प्रकारच्या पोषक घटकांची गरज असते व ही गरज विविध प्रकारचे रासायनिक खते तसेच विद्राव्य खतांच्या माध्यमातून पूर्ण केली जाते. या सगळ्या व्यवस्थापनामध्ये फळबागांसाठी संजीवकांचा वापर हा खूप महत्त्वाचा असतो. फळबागामध्ये संजीवकांचा वापराचे फायदे नेमके काय आहेत हे आपण जाणून घेणार आहोत.

संजीवके म्हणजे काय? : सजीव वनस्पतींमध्ये जी रासायनिक द्रव्य प्रमाणामध्ये कार्यरत होऊन त्या वनस्पतीच्या अंतर्गत कार्यपद्धतीत बदल घडवून आणतात त्यांना वनस्पती संजीवके म्हणतात. संजीवकांचे वाढ प्रेरक आणि वाढ निरोधक असे दोन मुख्य प्रकार आहेत.

फळझाडांमध्ये संजीवकांचे उपयोग : वनस्पतीमध्ये अभिवृद्धी करण्यासाठी - जेव्हा आपण कलमा करतो तेव्हा फाटे व गुटी कलमांना लवकर आणि भरपूर मुळे येण्यासाठी संजीवकांचा वापर होतो. शेंडा कलम, भेट कलम आणि डोळा भरणे या कलम पद्धतीत खुंट आणि सायन यांचे मिलन साधून एकजीव होण्यासाठी संजीवके मदत करतात. कलमे जगण्यासाठी आणि चांगल्या पद्धतीने वाढण्यासाठी देखील संजीवकांचा उपयोग होतो..

फळांचा बहर नियंत्रित करण्यासाठी - फळांमध्ये फुलांचा बहर येण्याअगोदर झाडांची शाखीय वाढ पूर्ण व्हावी लागते. वनस्पतीच्या अंतर्गत शरीरक्रिया आणि बाह्य वातावरण यांच्या एकत्रित परिणामामुळे शाखिय वाढ पूर्ण होण्यासाठी कमी अधिक वेळ लागतो. शाखीय वाढ होऊन ती पक्व झाल्यावर डोळ्यात फुलांची निर्मिती होते. ही निर्मिती काही काळ सुप्तावस्थेत राहते आणि ठराविक कालावधीनंतर डोळ्यातून फुलांचा मोहर बहराच्या रुपाने बाहेर पडण्यासाठी फळझाडांची अंतर्गत स्थिती आणि बाह्य वातावरणातील वातावरणातील सूर्यप्रकाश, आद्रता आणि तापमान या घटकांचा समन्वय साधण्यासाठी संजीवकांचा वापर होतो. झाडांच्या आकार मर्यादित राखण्यासाठी व उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी - बऱ्याचदा आपण पाहतो की फळ झाडांचा विस्तार जास्त मोठा होतो व त्यावर फळे खूप कमी लागतात. झाडांची वाढ झाल्यामुळे फळांची निगा राखणे व काढणे या गोष्टीदेखील अडचणीच्या होतात. अशा मध्ये झाडांची वाढ आणि विस्तार मर्यादित राखण्यासाठी मॅलिक हायड्रोझाईन क्लोरमक्काट इत्यादी संजीवके उपयुक्त ठरतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे फळझाडांच्या मर्यादित वाढ आणि विस्तारामुळे दर हेक्टरी झाडांची संख्या वाढवून घेता येते आणि उत्पादन क्षमता वाढते. फळपिकांचा काटकपणा आणि उत्पादन क्षमता - फळबागांमध्ये संजीवकांचा वापर करून झाडांना काटकपणा तसेच उत्पादनाची सुरुवात लवकर करता येते. आपल्याला माहित आहेच कि बरीच फळझाडे बहुवर्षीय असल्यामुळे सुरुवातीचे काही वर्षे फक्त त्यांची शाखीय वाढ होत असते. ही वाढ होत असताना संजीवकांचा वापर केला तर शाखीय वाढीवर मर्यादा येऊन फळे येण्याची व्यवस्था लवकर सुरू होते. शाखीय वाढ होत असताना शाखात लुसलुशीतपणा असतो व त्यामुळे हा भाग विशेष हवामानातील पाणीटंचाई किंवा रोग व किडींना लवकर बळी पडतो. परंतु संजीवकांचा वापर केल्यावर हा भाग कणखर बनतो.




### महत्वाच्या घटना

१८४६ : एलियास होवे याला अमेरिकेत शिवणाच्या मशिनचे पेटंट मिळाले.
१८९८ : लुइगी लुकेनीने ऑस्ट्रियाची राणी एलिझाबेथची हत्या केली.
१९३९ : दुसरे महायुद्ध कॅनडाने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४३ : दुसरे महायुद्ध जर्मन फौजांनी रोम ताब्यात घेण्यास सुरूवात केली.
१९३६ : प्रथम जागतिक वैयक्तिक मोटरसायकल स्पीडवे चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली.
१९६६ : पंजाब राज्याचे विभाजन होऊन पंजाब व हरियाणा अशी दोन राज्ये अस्तित्वात आली.
१९६७ : जनमत चाचणीत जिब्राल्टरच्या जनतेने स्पेनमधे सामील होण्याऐवजी ब्रिटनमधेच राहण्याचा निर्णय घेतला.
१९७५ : व्हायकिंग-२ हे अमेरिकन मानवविरहित अंतराळयान मंगळ ग्रहाकडे झेपावले.
१९९६ : गोमंतक मराठी अकादमीचा पहिला 'कृष्णदास शामा पुरस्कार' गोमंतकीय मराठी साहित्यिक बा. द. सातोस्कर यांना तर 'पंडित महादेवशास्त्री जोशी मराठी साहित्य पुरस्कार' कवी नारायण सुर्वे यांना जाहीर
२००१ : मार्क इन्ग्रॅम या स्पर्धकाने फसवणूक करुन इंग्लंडमधील कौन बनेगा करोडपती ही स्पर्धा जिंकली.
२००२ : परंपरेने तटस्थ देश स्वित्झर्लंड देश युनायटेड नेशन्समध्ये सामील झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७२ : के. एस. रणजितसिंहजी कसोटी क्रिकेट खेळाडू व महाराजा, यांच्या स्मरणार्थ १९३४ पासून 'रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा' खेळल्या जातात. (मृत्यू: २ एप्रिल १९३३)
१८८७ : गोविंद वल्लभ पंत स्वातंत्र्यसैनिक, भारताचे दुसरे गृहमंत्री व उत्तर प्रदेशचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे पहाडी पुरूष, प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष, भारतरत्न (१९५७), मागासवर्गीयांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कुमाँऊ परिषदेची स्थापना केली. (मृत्यू: ७ मार्च १९६१)
१८९२ : नोबेल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ आर्थर कॉम्प्टन यांचा जन्म.
१८९५ : कविसम्राट तेलुगू लेखक विश्वनाथ सत्यनारायण यांचा जन्म.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू मनीष पांडे यांचा जन्म.
१९१२ : बसप्पा दानप्पा तथा बी. डी. जत्ती भारताचे ५ वे उपराष्ट्रपती, पाँडेचरी व ओरिसाचे राज्यपाल आणि मैसूर प्रांताचे मुख्यमंत्री, राष्ट्रपती फख्रुद्दीन अली अहमद यांच्या आकस्मिक निधनामुळे जत्ती यांच्यावर राष्ट्रपतीपदाची जबाबदारी आली. पाच महिने ते हंगामी राष्ट्रपती (मृत्यू: ७ जून २००२)
१९४८ : भक्ती बर्वे अभिनेत्री (मृत्यू: १२ फेब्रुवारी २००१)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२१० : २१० इ.स.पू. : चीनची पहिले सम्राट किन शी हुआंग यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी २५९)
१९०० : रावबहादूर डॉ. विश्राम रामजी घोले महात्मा फुले यांचे सहकारी व नामवंत शल्यचिकित्सक (जन्म:)
१९२३ : सुकुमार रॉय बंगाली साहित्यिक आणि 'संदेश' या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक, चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रॉय यांचे वडील (जन्म: ३० आक्टोबर १८८७)
१९६४ : श्रीधर पार्सेकर व्हायोलिनवादक (जन्म: ? ? १९२०)
१९८३ : नोबेल पारितोषिक विजेते स्वीस भौतिकशास्त्रज्ञ फेलिक्स ब्लॉक यांचे निधन.
२००० : भारतीय-पाकिस्तानी पत्रकार आणि लेखक झैब-अन-नसीसा हमीदल्ला यांचे निधन. (जन्म: २५ डिसेंबर १९२१)
२००६ : टोंगाचा राजा टॉफाहाऊ टुपोऊ यांचे निधन.

# दुधातील फॅट, एसएनएफवर परिणाम करणारे घटक

जनावरांच्या दुधाचा भाव हा फॅट, एसएनएफ यांच्या प्रमाणावर ठरवला जातो. त्यामुळे किफायतशीर दुग्ध व्यवसाय होण्यासाठी केवळ दूध उत्पादन वाढवून उपयोग होत नाही, तर दुधाची प्रत सुधारणे सुद्धा महत्त्वाचे आहे. म्हणून दुधाला चांगला भाव मिळविण्यासाठी फॅट व एसएनएफचे प्रमाण वाढवण्यासाठी त्यावर परिणाम करणारे घटक आपणास माहिती असणे गरजेचे आहे.

दुधातील फॅट : दुधातील फॅट हे प्रामुख्याने खाद्यातील फॅट, शरीरात साठलेली चरबी आणि कासेत तयार होणारे फॅट यापासून बनलेले असते. जनावरांना चाऱ्यामध्ये जर ऊर्जा आणि तंतुमय पदार्थ जास्त असलेले घटक खायला घातले तर जनावराच्या शरीरात असणाऱ्या उपयोगी सूक्ष्मजीवांची चांगली वाढ होते. ते पुरेशा प्रमाणात फॅट तयार करतात. हे फॅट रक्तामार्फत कासेत येऊन दुधात उतरते. दुधातील फॅट ही प्रामुख्याने ट्रायग्लिसराइड (९८ टक्के)पासून बनलेले असते.

दुधातील एसएनएफ : दुधाची गुणवत्ता ठरवण्याचे हे एकक आहे. हे दुधाचे भाव ठरवण्यासाठी तपासले जाते. दुधात पाणी सोडून किती घटकमूल्ये आहेत हे मोजण्यासाठी 'एसएनएफ' मोजणे फायद्याचे ठरते. दुधात केसीन नावाचे प्रोटीन असते. काही जीवनसत्त्वे, खनिजे, लॅक्टोज असतात. यांचे दुधातील प्रमाण एसएनएफद्वारे ठरवले जाते. दुधाचा घट्टपणा याने मोजता येतो. जेवढा एसएनएफ जास्त तेवढी दुधाची गुणवत्ता जास्त असते. एसएनएफ मोजण्यासाठी लॅक्टोमीटर हे उपकरण वापरतात. केसिन हा दुधातील एसएनएफ वर परिणाम करणारा मुख्य घटक आहे.



याचे प्रमाण जर कमी झाले तर दुधाला एसएनएफ लागत नाही. दुधात केसिन मुक्त स्वरूपात न आढळता फॉस्फेट व कॅल्शिअम सोबत आढळते. दुधातील केसिन म्हणजेच एसएनएफ वाढवायचे असेल तर प्रथिने, कॅल्शिअम व फॉस्फरस हे तिन्ही घटक जनावरास देणे आवश्यक आहे. यांपैकी प्रथिने ही द्विदल वनस्पतीमध्ये आढळून येतात. उदा. मेथी ग्रास, चवळी, बरसीम इ.याशिवाय क्षार मिश्रणात कॅल्शिअम व फॉस्फरस हे घटक असतात.फॉर्म्यूलाद्वारे 'एसएनएफ' काढण्याची पद्धत : सुरुवातीला गर्बर पद्धतीने दुधातील फॅटचे प्रमाण किती आहे ते पाहा. लॅक्टोमीटर रीडिंग किती आहे ते पाहा आणि दुधाचे तापमान मोजा. त्यानंतर एसएनएफ फॉर्म्यूला वापरा. एसएनएफ टक्के = (लॅक्टोमीटर रीडिंग ४) + ०.२१ फॅट + ०.१४ दुधातील फॅट प्रमाणावर परिणाम करणारे घटक : दुधातील फॅटचे प्रमाण गुणसूत्राद्वारे नियंत्रित केले जाते. यामुळे दूध उत्पादन आणि दुधातील फॅटचे प्रमाण यांचा खूप जवळचा संबंध आहे. ज्या गाईचे दूध जास्त त्या दुधातील फॅटचे प्रमाण तुलनेत कमी असते. त्यामुळे ज्या गाईचे दूध उत्पादन व दुधातील फॅटचे प्रमाण अधिक आहे तसेच पैदाशीसाठी जो वळू वापरला आहे तोही जास्त दूध देणारी गाय व दुधातील फॅटचे प्रमाण अधिक असणाऱ्या गाईपासून तयार झालेला असावा. ज्या गाई गाभणकाळातील शेवटच्या टप्प्यात अशक्त असतात, त्यांच्या दुधातील फॅटचे प्रमाण हे कमी असते. ज्या जनावरांची शारीरिक स्थिती गाभणकाळात चांगली असते त्यांच्या दुधातील फॅटचे प्रमाण चांगले असते. त्यामुळे गाभणकाळातील शेवटच्या टप्प्यात गाईची शारीरिक अवस्था दर ३.५ प्रमाणे असावा. दुधातील फॅट मुख्यतः आहारातील तंतुमय पदार्थांच्या पचनाद्वारे तयार होते. जनावरांना जास्त प्रमाणात पशुखाद्य आणि कमी प्रमाणात चारा दिल्यास दुधातील फॅटचे प्रमाण कमी होते. आहारात योग्य प्रमाणात पशुखाद्य, हिरवा चारा आणि वाळला चारा हा दिवसातून दोन ते तीन वेळा एकत्रित मिसळून 'टीएमआर' स्वरूपात द्यावा. यामुळे दुधातील घटकांचे प्रमाण चांगले राहते. जनावरांना केवळ लुसलुशीत हिरवा चारा दिल्यास दुधातील फॅटचे प्रमाण घटते. जनावरांच्या आहारात केवळ प्रथिन स्रोतांचा पशुखाद्य म्हणून वापर न करता धान्य, पेंड, दुय्यम पदार्थ, चुणी, क्षार मिश्रण आणि मीठ यांचे योग्य प्रमाणात मिश्रण करून त्याचा पशुखाद्य म्हणून आहारात वापर करावा.





# महावीर चौकात हिरव्या झेंड्याविरोधात जैन समाजाचे निवेदन

जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील ऐतिहासिक आणि धार्मिक दृष्ट्या महत्त्वाच्या महावीर चौकात हिरवा झेंडा लावण्यात आल्याने जैन समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त झाला आहे. महावीर चौक हा जैन समाजासाठी धार्मिक व ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठिकाण असून, येथे भगवान महावीर स्वामी यांचे स्मृतीचिन्ह आहे. या धार्मिक स्थळावर अशा प्रकारची अनधिकृत कृती झाल्यामुळे समाजाच्या धार्मिक भावना गंभीरपणे दुखावल्या गेल्या आहेत. यासंदर्भात जैन समाजाच्या वतीने जालना महानगरपालिका आयुक्त, मा. पोलीस निरीक्षक, सदर बाजार पोलीस स्टेशन तसेच मा. पोलीस अधीक्षक जालना यांना स्वतंत्र निवेदने सादर करण्यात आली आहेत. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि.७ सप्टेंबर रोजी महावीर चौक परिसरात हिरवा झेंडा लावलेला आढळून आला आणि हा प्रकार शहरातील शांतता, सुव्यवस्था व सामाजिक ऐक्य बिघडविण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.



सकल जैन समाज सेवा व सकल हिंदू समाजाच्या वतीने बोलताना अक्षय गोरंट्याल म्हणाले, ''अलीकडेच आमच्या महावीर भगवान यांच्या स्मारक सेवापुतळा चौकात चुकीची घटना घडली. त्या ठिकाणी हिरवा झेंडा लावण्यात आला होता. तो आम्ही काढून टाकला असून, समाज व सकल हिंदू समाजाने गोमूत्राने पूर्ण परिसराची स्वच्छता करून पुन्हा आमचा झेंडा लावला आहे. यापूर्वीच आम्ही सदर बाजार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार व अनेक निवेदनं दिली होती. आता या घटनेनंतर आम्ही महापालिकेतही निवेदन देणार आहोत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून पुरावे मिळतील आणि त्यावर योग्य कारवाई व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. पोलिसांना आमची एकच विनंती आहे की अशा घटना सतत घडू नयेत. मागील १ तारखेलाही अशीच घटना घडली होती. त्या वेळी तत्पर कारवाई केल्याबद्दल आम्ही पोलीस प्रशासनाचे आभार मानतो. मात्र फक्त सात दिवसांत पुन्हा दुसरी घटना घडली आहे. यावरून स्पष्ट होते की काही विपरीत बुद्धीचे लोक समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करत आहेत. सकल हिंदू समाज व सकल जैन समाज शांततेने व संयमाने मार्ग काढत आहेत. मात्र तिसऱ्यांदा अशी घटना घडली तर आम्हालाही विचार करावा लागेल की आम्ही शांत राहावे की कठोर भूमिका घ्यावी. हे विपरीत बुद्धीचे लोक कोणत्यातरी संघटनांचे प्यादे असल्याचे दिसते. तरीही, आजपर्यंत आम्ही संयमाने मार्ग काढला आहे. पण पुन्हा अशी घटना घडली, तर आम्ही त्याचा तीव्र निषेध करू आणि कुणालाही माफ करणार नाही. शेवटी, प्रशासनाचे आम्ही आभार मानतो. पण आमची भाषा समजत नसेल, तर यानंतर त्यांना त्यांचीच भाषा ऐकवावी लागेल. जैन समाजाने दिलेल्या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे की, सदर कृती भारतीय न्याय संहिता () कलम २९९ व ३९८ अंतर्गत दंडनीय आहे. त्यामुळे संबंधित दोषींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, प्रशासनाकडे महावीर चौकातून हिरवा झेंडा तात्काळ काढण्याची, भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी परिसरात नियमित प्रशासकीय देखरेख व सुरक्षा उपाययोजना वाढवण्याची, तसेच महावीर चौकाचे स्वच्छता, सौंदर्यीकरण व योग्य देखभाल सुनिश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. या घटनेमुळे जैन समाजामध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटली असून, शहरातील धार्मिक सलोखा अबाधित राहावा याकरिता प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी समाजाची अपेक्षा आहे. समाजाने स्पष्ट केले आहे की, या घटनेवर तत्काळ लक्ष न दिल्यास धार्मिक भावना दुखावल्या जाण्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो.

## विद्यार्थी,शिक्षक व प्राध्यापक बनून शिक्षक दिन साजरा

अंबड। प्रतिनिधी

मत्स्योदरी शिक्षण संस्था अंतर्गत कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती निमित्ताने शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक केशव अटकर होते व प्रमुख पाहुणे विष्णू गणकवार होते .

कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्रा.राजेंद्र सानप सर होते व कॉलेज प्राचार्य तथा मुख्याध्यापक केशव अटकर यांनी भाषणाची सुरवात करतांना सर्वप्रथम आई वडिलांना अभिवादन केले व नंतर सर्व गुरुजांना आणि संस्थेचे अध्यक्ष कर्मयोगी अंकुशरावजी टोपे यांना वंदन करून आपल्या भाषणाची सुरवात केली व शिक्षक कसा असावा शिक्षकाची शिस्त कशी असावी त्याचं चारित्र्य कसं असावं डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती का साजरी केली जाते हे सांगून त्यांच्या विषयी



सविस्तर मार्गदर्शन केले व मुलातून मुख्याध्यापक म्हणून धातरकर व उपमुख्याध्यापक कपाटे तसेच विष्णू गणकवार, नामदेव तोडकर , प्रा. वर्षा धाईत, शामल कांगणे, मोहसीन सय्यद, प्रा. लक्ष्मण गोरे वंदना वाघमारे, वंदना सपकाळ, कांता खोजे, अरुण राऊत, त्रिंबक लोंढे, विठ्ठल सोमवारे, संतोष घायाळ, रवी गवळी,संतोष लिंगणवाड, रिचोडे. जगन्नाथ जाधव.संभाजी शिंदे.गीताराम शिंदे,मोताळे, अरूण नाटकर पारजी जवळकर कृष्णा भापकर,राजाराम काळे,भीमाशंकर वाघुंडे, गोंडगिरे आदी उपस्थित तसेच शिक्षक व प्राध्यापक बनलेले विद्यार्थी व विद्यार्थीनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती बरडे व सीमा सांगळे यांनी केले व खेळाची माहिती व आभार प्रदर्शन हिरा टेकाळे यांनी.


## हळदीच्या कार्यक्रमात खंजरने इंस्टाग्रामवर रिल बनवून व्हायरल

### दोघांना अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना। प्रतिनिधी

चंदनझिरा, जालना येथे खंजर बाळगुन इंस्टागामवर रिल बनवुन लोकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या दोन इसमांना ताब्यात घेणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना आरोपीतांना ताब्यात घेणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते.

त्याअनुषंगाने दि.०८/०९/२०२५ रोजी सचिन कैलास गायकवाड, बय-२१ वर्ष, रा.एकता चौक, चंदनझिरा, जि.



जालना २) सचिन शिवाजी जाधव, वय-२५ वर्ष, रा.एकता चौक, चंदनझिरा, जि. जालना यांना इंद्रायणी हॉटेल परिसर, चंदनझिरा जालना येथुन ताब्यात घेवुन त्यांच्या ताब्यातुन एका धारदार व तीक्ष्ण खंजर व इंस्टाग्राम व्हिडीओ बनविण्यासाठी व व्हायरल करण्यासाठी वापरलेला मोबाईल असा एकुण रु.४०००/-किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आले. आरोपीतांनी दि. ०४/०९/२०२५ रोजी चंदनझिरा येथे मित्राच्या हळदीच्या कार्यक्रमामध्ये धारदार व तीक्ष्ण खंजरसह नाचुन त्याचा व्हिडीओ तयार करुन तो इंस्टाग्रामवर पोस्ट करुन जनतेमध्ये दहशत निर्माण केली. त्यामुळे दोन्हीही आरोपीतांविरुध्द चंदनझिरा पोलीस ठाणे, जालना येथे सरकारतर्फ फिर्याद देवून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, संदीप चिंचाले, गणपत पवार यांनी केली आहे.

## पारनेर तालुक्यात एकाच आठवड्यात बिबट्याच्या हल्ल्यात दोघांचा मृत्यू; तीन वर्षीय बालकावर हल्ला

पारनेर । प्रतिनिधी

पारनेर ते सिद्धेश्वर वाडी रस्त्यावर सिद्धेश्वरवाडी रस्त्यावरील बारामती ॲग्रो परिसरात रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास एका तीन वर्षीय बालकावर बिबट्याने हल्ला केला आणि त्यास जंगलाकडे ओढून नेल्याची घटना घडली. सिद्धेश्वरवाडी रस्त्यावर वास्तव्यास असलेल्या या बांधकाम मजूराच्या (परप्रांतीय) कुटुंबातील हा मुलगा होता.

अमन पन्नूलाल खुंटे (वय ३) असे त्याचे नांव असून तो रात्री नऊ वाजनेच्या सुमारस लघुशंकेसाठी घराबाहेर आला असताना त्याच्या आईच्या डोळ्यासमोरच बिबट्याने त्याच्यावर झडप घेतली व जगंलाच्या दिशेने झाडीत ओढून नेले. स्थानिक नागरिकांनी तातडीने ही घटना वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली. त्या नंतर वन विभागाने रात्री दोन वाजेपर्यंत युद्धपातळीवर या मुलाचा शोध घेतला मात्र तो सापडला नाही. यावेळी स्थानिक नागरिकही शोध मोहिमेत सहभागी होते. मंगळवारी सकाळी सात वाजलेपासुन पुन्हा शोध मोहीम सुरु केली. सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास सिद्धेश्वरवाडी परिसरातील जंगलात, घटनास्थळापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर झुडपात अमनचा मृतदेह सापडला. रात्री व सकाळी घेण्यात आलेल्या शोधमोहिमेत वनपरिक्षेत्र अधिकारी जी. व्ही. धाडे, वनपाल एम. वाय. शेख, वनरक्षक अफसर पठाण, फारुख शेख, कानिफनाथ साबळे, एस. के. कार्ले, साहेबराव भालेकर, अंकराज जाधव, यांच्या सह स्थानिक नागरिकांनी सहभाग घेतला होता. बिबट्याचा शोधासाठी या जंगल परिसरात पिंजरे लावण्यात आले आहेत. तसेच या परिसरात गस्त वाढवण्यात आली आहे. तालुक्यात नुकतीच दोन सप्टेंबरला कळस येथेही बिबट्याच्या हाल्याची अशीच दुर्दैवी घटना घडली होती. त्यात गणेश गाडगे (वय ४०) या व्यक्तीचा मृत्यू झाला होता. तालुक्यातील एकाच आठवड्यातील ही दुसरी घटना असल्याने तालुकाभर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. तालुक्यात या पूर्वी पाळीव प्राण्यांवर हल्ले होत होते आता थेट मानवी वस्तीकडे बिबटयाचा वावर वाढला आहे. व त्यातही थेट मानवी हळ्यामुळे नागरिकांमध्ये बिबट्याच्या हल्ल्यांमुळेही चिंता वाढली आहे.

## ग्रामपंचायत सदस्य यांचा पती लाच घेताना पकडला

जालना । प्रतिनिधी

धानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजुर घरकुलाचा पहिला हप्ता खात्यावर टाकण्यासाठी नारायण रमेशराव खंडागळे शेवगा सारवाडी ग्रुप ग्रामपंचायत सदस्य यांचे पती) यांनी ३,०००/-रुपये लाचमागणी करुन ती स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडले. नारायण खंडागळे, (शेवगा-सारवाडी ग्रुप ग्रामपंचायत सदस्य यांचे पती) रा. शेवगा ता. जालना जिल्हा जालना. ०८ सप्टेंबर रोजी १५.०० वाजेच्या सुमारास दोस्ती वडापाव सेंटर जवळ, यातील तक्रारदार यांचे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या घरकुलाचा पहिला हप्ता लाभार्थी तक्रारदार यांच्या खात्यावर टाकण्यासाठी नारायण रमेशराव खंडागळे यांनी तक्रारदार यांना ३,०००/-रुपये लाचमागणी केली, परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांचे कडे तक्रार केली.

सापळा कार्यवाही दरम्यान नारायण खंडागळे यांनी ३०००/-रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पोलीस निरीक्षक, कोमल शिंदे यांनी व त्यांचे पथकाने ताब्यात घेतले. व अंगझडती घेतली असता लाच रक्कम ३०००/-रुपये इतर २४०/-रुपये व विवो कंपनीचा मोबाईल मिळून आला. या प्रकरणी मौजपुरी पोलीस ठाला येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे. सदरची कामगीरी श्रीमती, माधुरी केदार कांगणे, पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, श्री. शिकांत सिंगारे, अपर पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, पर्यवेक्षण अधिकारी श्री. बी. एस. जाधवर पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि. जालना यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, कोमल शिंदे व पथकातील पोलिस अंमलदार, पोहेका / श्रीनिवास गुड्डर, पोलिस अंमलदार शिवलिंग खुळे, अमोल चेके, संदीप लहाने, अशोक राऊत चालक पोहेका विठ्ठल कापसे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांनी केली.

## शिवराज महाविद्यालय परतूर येथे राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी



परतूर। प्रतिनिधी

शिवराज महाविद्यालय परतूर येथे दि.०७ सप्टेंबर २०२५ रोजी राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्व प्रथम राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य एस.आर.नाटकर सर हे होते. प्रमुख व्याख्याते इतिहास प्रमुख प्रा.जी.बी.मोरे सर यांनी राजे उमाजी नाईक यांच्या भारतीय स्वातंत्र्य लढा व त्यांचे योगदान याबद्दल विद्यार्थ्यांना मोलाची माहिती दिली तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.बी.एम.शेंडगे सर यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. जी. बी. डव्हारे सर यांनी केले.यावेळी प्रा.सी.एस. राजपुत, प्रा. एस. एल. शाहीर, प्रा. व्हि. आर. भारसाखळे, प्रा.एम. एस. सराफ, प्रा. एस.ए.देशपांडे, प्रा.पी. एस. सुरुंग, प्रा.के.जी.चव्हाण, प्रा. ए. एस. गायकवाड,प्रा.एन.बी गायकवाड, प्रा.ए.एस.चुंगडे आदी उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**मा. माणिकराव रा. सातव ७ वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर १३७७/२०२५**

**बालु सुखदेव सानप वि. निरंक**

अर्जदार १. बाळु पि. सुखदेव सानप वय ४६ वर्षे. धंदा शेती रा. सानपवाडी ता. जि. बीड, २. गोविंद पि. सुखदेव सानप वय ४३ वर्षे धंदा शेती रा.सानपवाडी ता. जि. बीड, ३. मंगलाबाई भ्र. विश्वनाथ मोराळे थप ५६ वर्षे धंदा घरकाम रा. निवडुंगवाडी पो. येळंबघाट ता जि. बीड, ४. निलावती भ्र. दैवान मुंडे, वय ५५ वर्ष धंदा. घरकाम रा. निवडुंगवाडी येळंबघाट ता.जि. बीड, ५. कलावती भ्र. गोरख खंदारे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम रा. कारेगव्हाण पो. कळसंबर ता.जि. बीड, ६. द्रोपती भ्र संभाजी खंदारे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. कारेगव्हाण पो. कळसंबर ता. जि. बीड

गैरअर्जदार विरुद्ध निरंक

मागणी: वारस प्रमाणपत्र मिळणे बाचत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सुखदेव पि. बापुराव सानप यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी सुखदेव पि. बापुराव सानप, मृत्यु दि. २८/०९/२००८ रोजी मौजे रा. सानपवाडी ता. जि. बीड येथे मयत झाले असून अर्जदार क्र १ व २मयताचे मुले असून अर्जदारा क्र ३ते६ ह्या मयताच्या मुली आहेत. यांना अर्जदारा व्यतिरिक्त इतर कुणीही वारस नाहीत. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की सदरहु अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयतसुखदे पि. बापूराव सानप यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक/९/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.१४/१०/२०२५ आहे.

स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती ए, बी, निवारे १९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व, स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १३३८/२०२५**

**मार्फत : ॲड. बी.एन.तावरे**

**संभाजी वगैरे विरुध्द निरंक**

अर्जदार : (१) संभाजी बबन हरणमारे, वय ३६ धंदा शेती रा. पांगरी रोड, बीड ता. जि. बीड, २) महादेव बबन हरणमारे, वय ३२ धंदा शेती रा. पांगरी रोड, बीड ता. जि. बीड, ३) आशाबाई महादेव शिंदे, वय ३९ धंदा घरकाम रा, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड, ४) उषा राम शिंदे, वय ३५ धंदा घरकाम रा. पांगरी रोड, बीड ता. जि. बीड,

विरुष्द निरंक

मागणीअर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत बबन रामचंद्र हरणमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत बबन रामबंद हरणमारे यांचा मृत्यु दि. १०/०९/२०२३ रोजी राहते घरी, पांगरी रोड, बीड, ता.जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ३ व ४ या विवाहीत मुली आहेत. मयताचे पत्नी, आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय आमाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे काळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत बबन रामचंद्र हरणमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१ माहे ऑगस्ट २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९ सप्टेंबर २०२५.

**स्वाक्षरीत**
**क. लि**

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

## शिक्षित बेरोजगारांचे प्रमाण चिंताजनक : कॉ.अजित अभ्यंकर

जालना। प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षक संघाचे उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे यांच्या सेवापुर्ती निमित्त प्रकाशित करण्यात आलेल्या शिक्षणः प्रश्न अनेक-ऊत्तर एक गौरव ग्रंथवर नांदेड येथे परिसंवाद संपन्न झाला. शिक्षण क्षेत्रातील अरिष्ट हे केवळ या क्षेत्रातील नसून शिक्षण, रोजगार व आर्थिक विकास यांच्या तुटलेल्या सांध्यातील असल्याचे प्रतिपादन कॉम्रेड अजित अभ्यंकर यांनी केले.

पीपल्स कॉलेज नांदेडच्या नरहर कुरुंदकर सभागृहात संपन्न झालेल्या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी सूर्यकांत विश्वासराव होते. कामगार नेते कॉम्रेड अजित अभ्यंकर आणि राजकीय विश्लेषक प्रा अशोक सिध्देवाड भाष्यकार तर मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम, पुस्तकाचे संपादक प्रो डॉ. मारोती तेगमपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष व्यंकटराव चिलवरवार यांनी केले. एका तासाच्या आपल्या भाषणात अभ्यंकर यांनी शिक्षण क्षेत्रातील भयाण वास्तवाचा उहापोह केला. देशात बेरोजगारीचा दर ८% ते ९% असून त्यामधे शिक्षित बेरोजगारांचे प्रमाण जास्त असून ही बाब असल्याचे चिंताजनक अभ्यंकर म्हणाले. कायम कर्मचाऱ्यांची संख्या कमी कमी होत आहे. राज्य सरकारच्या विविध अस्थापनेत सुमारे




अडीच लाख पदे रिक्त असून ऐंशी टक्के कर्मचारी कंत्राटी पध्दतीने भरती करण्यात आले आहेत. प्रगत देशात सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात सात ते तीस टक्के असून आपल्या देशात हे प्रमाण दिड टक्क्यापेक्षा थोडे जास्त असल्याचे सांगून देशात क्रॉनी कॅपिटलिजम तर आहेच परंतु देशाचे सरकारच क्रॉनी असल्याचे ते म्हणाले. प्रसिद्ध राजकीय विश्लेषक प्रा अशोक सिध्देवाड परिसंवादात भूमिका मांडताना म्हणाले की, ब्रिटिश देशातून जाणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे तर देशातील सर्व नागरिकांना विकासाच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत. शिक्षण, आरोग्य सुविधा पुरविणे सरकारची जिम्मेदारी असताना आपल्या देशातील सरकार मात्र आपल्या या घटनादत्त जिम्मेदारी पासून पळ काढत आहे. यावेळी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे आणि पुस्तकाचे संपादक प्रो डॉ. मारोती तेगमपुरे यांची समयोचित भाषणे झाली. सूर्यकांत विश्वासराव यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन आनंद कर्णे यांनी केले.

# जिल्ह्यातील १४ माध्यम प्रकल्प १०० टक्के भरले

## माजलगाव ९४.३६% तर ऊर्ध्व कुंडलिका ९५.५% भरले

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यामध्ये यंदाच्या हंगामात चांगला पाऊस झाला असून या पावसामुळे जिल्ह्यातील सर्वात मोठा असलेला माजलगाव प्रकल्प ९४.३६% भरला आहे .तर जिल्ह्यातील १६ माध्यम प्रकल्पापैकी १४ मध्यम प्रकल्प १००% भरले आहेत. ऊर्ध्व कुंडलीका ही ९५.५% एवढा भरला आहे.**

बीड जिल्ह्यामध्ये माजलगाव हा मोठा प्रकल्प असून सोळा मध्यम प्रकल्प आहेत त्यापैकी बिंदुसरा, सिंदफणा, बेलपारा, महासांगवी, कडा, कडी, तलवार, कांबळी, वाण, बोरणा, बोधेगाव, सरस्वती, कुंडलिका, वाघे बाभूळगाव हे प्रकल्प १००% भरले आहेत. बीड जिल्ह्यामध्ये १२६ लघु प्रकल्पापैकी जवळपास सर्वच प्रकल्प भरले असून याची टक्केवारी ८४.११ एवढी आहे. याशिवाय बीड पाटबंधारे विभागा अंतर्गत येत असलेला ऊर्ध्व कुंडलिका हा प्रकल्प ९४.५% एवढा भरला आहे. जिल्ह्यातील एकूण १६७ प्रकल्पापैकी जवळपास सर्वच प्रकल्प पूर्णपणे भरले असून ही टक्केवारी ९१.६४ एवढी आहे. मागील वर्षी या दिनांकाला बारा प्रकल्प भरले होते. सध्या जिल्ह्यात ७०५. ३५२ दलघमी एवढा पाणीसाठा उपलब्ध आहे. मागील वर्षी यावेळी ३७९.०५४ दलघमी एवढा पाणीसाठा होता. मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी प्रकल्प लवकर भरले असून मे महिन्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने जिल्ह्यातील जवळपास सर्वच प्रकल्प तुडुंब भरले आहेत. बीड शहराला पाणीपुरवठा करणारा माजलगाव व बिंदुसरा प्रकल्पही जवळपास पूर्ण भरल्याने आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. जिल्ह्यातील छोटे मोठे तलावही जवळपास पूर्ण भरल्याने आगामी काळात बीड जिल्ह्याला पाणीटंचाई जाणवणार नाही असे अपेक्षित आहे. पाऊस चांगला झाल्याने शेतकऱ्यांची पिके चांगली असून काही ठिकाणी अतिवृष्टी झाल्याने मात्र शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यासाठी प्रशासन पाहणी करून या शेतकऱ्यांना आर्थिक मदत करेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांमधून व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांना पीक नुकसानीची भरपाई द्यावी अशी मागणी विवीध शेतकरी संघटनांकडून सरकारकडे होत आहे.



**पाणी जपून वापरा**

यावर्षी पाऊस काळ चांगला झाल्याने पाणीसाठा भरपूर झाला असला तरी पिकांना पाणी देण्यासाठी शेतकरी विद्युत पंपाद्वारे या पाण्याचा तलावातून उपसा करतात.त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाते. हे पाणी आपली संपत्ती असून पाणी जपून वापरा असा सल्ला बीड जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## कॉ.अजय बुरांडे यांना अटक

### सरकारच्या दडपशाहीचा माकपकडून जाहीर निषेध –जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

बीड । प्रतिनिधी

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे बीड जिल्हा सचिव कॉम्रेड अजय बुरांडे व इतर शेतकरी नेत्यांना पोलिसांनी अटक केली या घटनेचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची बीड जिल्हा कमिटी च्या वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे. अंबाजोगाई तालुक्यामध्ये गिरवली या ठिकाणी सरकारने शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यासाठी सुरुवात केली. शक्तीपीठ मार्गासाठी जमीन अधिग्रहण करण्याचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने सातत्याने विरोध केला आहे. शेतकऱ्यांना विचारात न घेता, त्यांना पूर्वा सूचना न देता, तहसीलदार व उपजिल्हाधिकारी जमीन ताब्यात (ता.०९ ) घेण्यासाठी गेले. याचा विरोध काही शेतकऱ्यांनी केला. यावेळी शेतकरी नेते अजय बुरांडे यांच्यासह मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे इतर कार्यकर्त्यांनी केला.

विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांसह शेतकरी नेते अजय बुरांडे यांना जिल्हा प्रशासनाने पोलीस दडपशाहीचा वापर करून अटक केली. ही घटना शेतकऱ्यांवर अन्याय करणारी आहे. या घटनेचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष बीड जिल्हा कमिटी तीव्र निषेध करत आहे. शेतकऱ्यांचे जमिनीचे अधिग्रहण तात्काळ थांबवावे. शेतकऱ्यांना पर्यायी शेत जमीन उपलब्ध करून द्यावी. अटक केलेल्या कार्यकर्त्यांची तात्काळ सुटका करावी इत्यादी मागण्यासाठी उद्या दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चामध्ये सर्व शेतकरी शेतमजूर शेतकरी पुत्रांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष बीड जिल्हा कमिटीच्या वतीने करण्यात येत आहे.

## केजमध्ये ओबीसींचा मोर्चा; दोन तास वाहतूक झाली ठप्प

### मराठा समाजाचा ओबीसींमध्ये समावेश अन्यायकारक –ॲड.सुभाष राऊत

केज । प्रतिनिधी

मागच्या पिढ्यान पिढ्या ओबीसी प्रवर्गामध्ये जगत असलेला सर्वसामान्य समाज आजही मुख्य प्रवाहामध्ये आलेला नाही. दिवसेंदिवस ओबीसी प्रवर्गामध्ये वेगवेगळ्या जाती समाविष्ट होऊन सुमारे साडेतीनशे जाती ओबीसी प्रवर्गात सामील झाल्या आहेत.मात्र याला प्रचंड विरोध होत असून ओबीसी समाज खडबडून जागा होत मोर्चे, आंदोलने आणि निवेदन देत आहे. मराठ्यांना सरसकट ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी जोर धरू लागल्याने सरकार आंदोलन व दबावाला बळी पडून ओबीसी



समाजावर अन्याय होईल असे निर्णय घेत आहे. आणि नुकताच एक जीआर काढून अगदी शपथपत्रावरही जातीचे प्रमाणपत्र द्या असे त्यात नमूद केले असल्याने ओबीसी समाज अस्थिर झाला असून त्यांच्यावर अन्याय करण्यात आलेला आहे. मागच्या कित्येक पिढ्यांपासून ओबीसी प्रवर्गामध्ये असणाऱ्या जाती मोल मजुरी करून पोट भरत आलेल्या आहेत. आणखीही म्हणावा तेवढा सामाजिक पटलावर तो समाज आलेला नाही. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या लोकसंख्येमुळे आहे त्या आरक्षणामध्येच न्याय मिळताना ◀◀ पान २ वर

## चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला फाशी द्या; अंबाजोगाईकरांची मागणी

### दलित अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीचा निषेध मोर्चा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परळी वैजनाथ रेल्वे स्टेशन परिसरात चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला फाशी द्या अशी मागणी अंबाजोगाईकरांनी केली. यासह विविध मागण्यांसाठी दलित अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीच्या वतीने मंगळवारी निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी यांना



निवेदन देण्यात आले.

दलित अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीच्या वतीने मंगळवारी निषेध मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाची सुरूवात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील नामफलकास अभिवादन करून करण्यात आली. हा मोर्चा निषेधाच्या घोषणा देत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, बस स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे उपविभागीय कार्यालयावर धडकला. निवेदन देण्यापूर्वी ◀◀ पान २ वर

## मिळालेल्या पदाचा उपयोग विद्यार्थी, समाज तसेच राष्ट्राच्या उन्नतीसाठी करा –डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ, सोलापूर येथे मायक्रोबायोलॉजी विषयाच्या अभ्यास मंडळावर तज्ज्ञ सदस्य म्हणून प्रा.डॉ.अनिल नरसिंगे यांची नियुक्ती झाल्याबद्दल तसेच विजय कचरे यांचे तज्ज्ञ विशेष शिक्षक म्हणून भरती झाल्याबद्दल महात्मा फुले स्मारक समिती अंबाजोगाई तर्फे स्मारक स्थळी सत्कार करण्यात आला.

यावेळी सत्यशोधक विचारमंचावर अध्यक्षस्थानी



सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले, स्मारक समितीचे उपाध्यक्ष रामेश्वर खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी मिळालेल्या संधीचा आणि पदाचा समाजाच्या हितासाठी आणि उन्नतीसाठी उपयोग व्हावा ही अपेक्षा व्यक्त केली. सत्काराला उत्तर देताना प्रा.डॉ.नरसिंगे यांनी या अभ्यास मंडळावर नियुक्ती ही अवघड बाब होती. मिळालेल्या या संधीचे सोन्यात रूपांतर निश्चित करून दाखवेन तसेच विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये या अभ्यासक्रमाचा दैनंदिन बाबींमध्ये कसा उपयोग करून घेता येईल, याबाबत अभ्यासक्रम बनविण्याचा प्रयत्न करेल असे सुतवाच केले. प्रा.विजय कचरे यांनी विशेष शिक्षक ही अत्यंत अवघड जबाबदारी आहे मतिमंद मुलांना समजून घेऊन त्यांच्या भावनांना त्यांच्या विचारांना योग्य प्रतिसाद देणे आणि त्यांच्याकडून आवश्यकते शैक्षणिक कार्य करून ◀◀ पान २ वर

## डिजिटल मीडिया राज्य अधिवेशनाला उपस्थित रहा

### साळुंके,मुडेगावकर,सुतार, अरबुने,हांगे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिरात सकाळी १० वाजता होत आहे. या अधिवेशनाला बीड जिल्ह्यातील सर्व जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा



कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार,जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय अरबुने जिल्हा प्रसिध्दी प्रमुख संजय हांगे यांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौका जवळील संत एकनाथ रंग मंदिरात दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात होणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्याचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, ◀◀ पान २ वर

## बुद्धिबळ स्पर्धेसाठी मनस्वी दिनकर शिंदेची दुसऱ्यांदा निवड

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील शालेय बुद्धिबळ स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या गटात झालेल्या स्पर्धेत मनस्वी दिनकर शिंदे ही तालुकास्तरावर प्रथम आली असून तिची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. गेल्या वर्षीही तिने तालुकास्तरावर प्रथम येवून जिल्हास्तरावर गेवराई तालुक्याचे प्रतिनिधित्व केले. होते.

दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी गेवराई तालुका शालेय क्रीडा स्पर्धा, बीड जिल्हा क्रीडा संचालनालय व गेवराई गटविकास अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या क्रीडा स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. मुलींच्या १४ वर्षे वयोगटात झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेत ◀◀ पान २ वर



## मेंढपाळाचा खून करणाऱ्या आरोपीस एलसीबीकडून अटक

बीड । प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील कासार येथील मेंढपाळ गोपाळ भीमराव शिंगाडे यांच्याकडे मेंढपाळ म्हणून सालगडी असलेला दीपक केरा भिलाल व शांताराम चंदू शिंदे यांच्याकडे मेंढपाळ म्हणून सालगडी असलेला विलास एकनाथ मोरे या दोघांमध्ये बाचाबाची होऊन विलास याने दीपक यांच्या डोक्यात दगड घालून त्याचा खून केला व नंतर पळून गेला. या आरोपीला गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने शोधून आनंदगाव परिसरात ताब्यात घेतले.

दिनांक ५ सप्टेंबर रोजी दीपक भिलाल व विलास एकनाथ मोरे हे दोघे दगडवाडी शिवारात जेवण करून झोपले असता विलास मोरे याने पहाटे.३० च्या सुमारास दीपक भिलाल याच्या डोक्यात दगड घालून खून करून तो पळून गेला. या प्रकरणी गोपाळ शिंगाडे यांच्या



फिर्यादीवरून पाटोदा पोलीस ठाण्यात कलम १०३ भा.न्या. संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल झाला. या प्रकरणी पोलीस अधीक्षकांनी आरोपीचा शोध घेण्याच्या आदेश ◀◀ पान २ वर

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते वृक्षारोपण उपक्रमाचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

हरित आणि प्रदूषणमुक्त शहराच्या निर्मितीसाठी बीड जिल्हा प्रशासनाने आज एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते वृक्षारोपण उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या मोहिमेमुळे शहराचा सौंदर्यवृद्धीसोबतच पर्यावरण संवर्धनालाही बळकटी मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या



प्रारंभी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः झाडाचे रोप लावून मोहिमेचा शुभारंभ केला. त्यांनी या निमित्ताने शहरातील प्रमुख रस्त्यांच्या डिव्हायडरवर तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचा संकल्प व्यक्त केला. या उपक्रमाअंतर्गत शहराच्या मुख्य रस्त्यांवर व महामार्गालगत हजारो झाडे लावली जाणार आहेत. या वृक्षांमुळे ◀◀ पान २ वर

## ज्येष्ठ स्वतंत्र सेनानी सर्जेराव पाटील यांनी आयुष्यभर करारी बाणा जपला –आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील किन्ही गावातील ज्येष्ठ स्वातंत्र सैनिक सर्जेराव दादा काकडे यांनी आयुष्यभर करारी बना जपला गावचे सरपंच,पंचायत समिती सदस्य, स्वातंत्र्य सैनिक अध्यक्ष व विविध पदाधिकारी असे पदावर ते निवडून आले.पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष तर स्वातंत्र सैनिक संघटनेचे तालुकाध्यक्ष ही पद ही त्यांनी भूषवली एक अभ्यासु व भारदस्त व्यक्तिमत्व सर्जेराव दादांच्या रुपाने आपण



पाहिले.त्यांचे सुपुत्र शरद काकडे व डा.आप्पासाहेब काकडे हे माझे महाविद्यालयीन मित्र असुन ते सध्या पुण्यात आहेत. त्यांनी स्वातंत्र्य सेनानी दादांचे विचार पुढे घेऊन जावेत.आणि जन्मभुमीला विसरी नये आसे सांगत किन्ही गावाला १६ स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास आहे तर शहीद रमेश काकडे हे ही याच गावातील देशासाठी शहीद झाले त्यांनी बलिदान दिले आहे.ज्येष्ठ स्वतंत्र सेनानी सर्जेराव पाटील यांनी आयुष्यभर करारी बाणा जपलाअसल्याचे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले. स्वातंत्र्य सैनिक सर्जेराव दादा पाटील यांच्या स्मृतिस्थळावरील अर्धपुतळा आनावरण प्रसंगी बोलताना केले.आ.धस पुढे बोलताना म्हणाले की, या तालुक्यातील स्वतंत्र सैनिकांनी रजाकारांच्या ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...



# त्या दिवशी मी केरळमध्ये, नातवाचा खून करून मला काय मिळणार? बंडू आंदेकरचा युक्तिवाद

पुणे । प्रतिनिधी

आयुष कोमकर माझा नातू, त्याचा खून करून मला काय मिळणार? कौटुंबिक वादातून आपल्याला या प्रकरणात गोवण्यात आलं आहे असा युक्तिवाद बंडू आंदेकरकडून (इरपर्वी -पवशज्ञरी) करण्यात आला. आपल्या मुलाची गेल्या वर्षी हत्या झाली, त्या प्रकरणात आपण फिर्यादी आहोत. त्याचा बदला म्हणून आपले नाव घेण्यात आले असल्याचं बंडू आंदेकरकडून सांगण्यात आलं. आयुष कोमकरची ज्या दिवशी हत्या (-ग्रीह घोज्ञरी र्चीवशी उरीश) झाली त्या दिवशी आपण केरळमध्ये होतो असा युक्तिवादही करण्यात आला.



पुण्यातील आयुष कोमकरच्या हत्या प्रकरणी न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या प्रकरणात बंडू कोमकर याच्यासह सर्व आरोपींना सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे १५ सप्टेंबर रोजी आरोपींनी पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. या प्रकरणी बंडू आंदेकरच्या वकिलांनी जोरदार युक्तिवाद केला. तर बंडू आंदेकर आणि त्याची टोळीच या प्रकरणात आरोपी असल्याचा प्रतिवाद सरकारी वकिलांनी केला. या प्रकरणात आोरपी बंडू आंदेकरच्या वतीने युक्तिवाद करताना म्हटलं की, आम्ही गेल्या १० तासांपासून अटकेत आहोत. जो गुन्हा दाखल करण्यात आला आहे तो चुकीचा आहे. कल्याणी माझी मुलगी आहे जिने फिर्याद दिली. जो मयत झाला तो नातू आहे. गेल्या वर्षी माझ्या मुलाचा खून झाला होता. त्यात मी फिर्यादी आहे. मी त्यावेळी सांगितलं होतं की कल्याणीने देखील कट रचला होता. या प्रकरणात तिच्या कुटुंबीयांना अटक झाली आहे. त्याचाच बदला घेण्यासाठी मला यामध्ये गोवण्यात आलं आहे.

मी माझ्या नातवाचा खून का करू? मला काय मिळणार?आयुष माझा वैरी आहे का? असे प्रश्न उपस्थित करत बंडू आंदेकरने त्याच्यावर दाखल झालेला गुन्हा चुकीचा असल्याचं सांगितलं. वनराज आंदेकर हत्या प्रकरणात मी फिर्यादीच्या पतीचे, सासऱ्याचे आणि दीराचे नाव घेतले आहे. म्हणून माझं नाव यात गोवल गेलं असा आरोप बंडू आंदेकरने केला. माझं संपूर्ण कुटुंब जेल मध्ये गेलं पाहिजे हाच यामागचा उद्देश आहे. कारण माझ्या मुलाच्या खून प्रकरणी मी कल्याणीच्या घरच्यांना जेलमध्ये पाठवलं आहे असंही बंडू आंदेकरच्या वतीने सांगण्यात आलं. ज्या दिवशी आयुष कोमकरची हत्या झाली त्यावेळी आपण केरळमध्ये असल्याचा दावा बंडू आंदेकरने केला. आमचे घरघुती वाद आहेत, म्हणून नाव घेतलं गेलं असंही म्हटलं.

आंदेकर आणि कोमकर परिवारात वाद आहे हे मान्य आहे. आरोपीच्या मुलाचा गेल्या वर्षी खून झाला होता, त्याच्या हत्येचा बदला घेण्यासाठीच आयुष कोमकरला मारल्याचा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. या प्रकरणी सर्व आरोपींची एकत्रित चौकशी करायची आहे. या प्रकरणी अजून कोण सहभागी आहे याचा तपास करायचा आहे असं सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितलं.

१३ जणांनी कट रचला

तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयाला सांगितलं की, आयुष कोमकरच्या हत्येचा कट हा १३ जणांनी रचला होता. त्यापैकी दोघांनी भवानी पेठमधील पार्किंगमध्ये जात पिस्तूलने फायरिंग करून खून केला. इतर आरोपींच्या सांगण्यावरून हा खून करण्यात आला. या प्रकरणात वापरण्यात आलेले पिस्तूल आम्हाला जप्त करायचं आहे. पिस्तूल आणि गोळ्या कुठून आणल्या याचा तपास करायचा आहे. इतर पाच आरोपी फरार आहेत, त्यांचा पत्ता याच आरोपींना माहिती आहे. त्यामुळे या प्रकरणाचा सखोल तपास करायचा आहे.

या प्रकरणातील आरोपींनी सोमनाथ गायकवाड याच्या घराची देखील रेकी केली होती. आंदेकर टोळीने याआधी आंबेगावमध्ये सोमनाथ गायकवाड यांच्या घरावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणातील अनेक आरोपी हे रेकॉर्डवरचे गुन्हेगार आहेत, त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत. एकेका आरोपीवर २२ किंवा ३३ गुन्हे दाखल आहेत अशी माहिती तपास अधिकाऱ्यांनी दिली.

# होलसेल किराणा दुकानावर चोरट्यांनी मारला काजू बदामावर डल्ला






पुणे । प्रतिनिधी

मोशी : बाबो कांदा भाजीपाला मार्केट येथे होलसेल किराणामाल दुकानांमध्ये चोरांनी मारला काजू बदाम खाद्य तेलावर डल्ला प्रामुख्याने भाजी मार्केट आणि होलसेल मार्केट या भागामध्ये आहे गजबजलेल्या भागात चोरट्याने आपला हात साफ केला इतर किराणामारा बरोबरच काजू आणि बदामावर डल्ला मारला या घटनेमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मोशी बोराडे वस्ती येथील कांदा भाजीपाला मार्केट येथे तेलाचे डब्बे चोरी केल्याची माहिती मिळाली तेव्हा आमचे दैनिक राज्य लोकतंत्र चे प्रतिनिधी तिथे जाऊन होलसेल दुकानाचे व्यापारी यांच्याशी संपर्क साधला चर्चा केली तेव्हा मिळालेल्या माहितीनुसार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी च्या रात्री २ ते ३ च्या दरम्यान अज्ञात चोरांनी होलसेल गोडाऊन अर्जुनदस छगनमुल गाळा क्रं ३४ याचे कुलूप तोडून साधारणता १९९ जेमिनी तेलाचे डबे जवळपास किंमत ३ लाख व गाळा क्रं ८ शांती ट्रेडिंग होलसेल व्यापारी यांच्या दुकानातुन जवळपास ४ लाख रुपये किंमतीचे ड्राय फ्रुट व सी सी टिव्ही असे अजून २ दुकानांमधून जवळपास २० ते २५ लाख रुपये पर्यंतचा मुद्देमाल व खाद्यतेल ड्राय फ्रूट चोरून नेल्याची माहिती दुकान मालकांनी सांगितली मोशी बोराडे वस्ती येथील सर्वात मोठ कांदा भाजीपाला मार्केट या ठिकाणी होलसेल दरामध्ये किराणा मालाचे सुद्धा व्यापारी त्या ठिकाणी व्यवसाय करतात एवढ्या मोठ्या मार्केटमध्ये जवळपास १५ ते १६ सिक्युरिटी गार्ड आहेत परंतु चोरीची घटना घडली त्या रात्री नाईटला पाच सिक्युरिटी गार्ड असल्याची माहिती मिळाली आम्ही माहिती सिक्युरिटी गार्ड कडे घेण्याकरता गेलो असता नाईटला असलेला सिक्युरिटी गार्ड तिथून पळ काढून निघून गेल्याचे निदर्शनास आले एवढ्या मोठ्या मार्केटला एकच गेट आहे आऊट आणि इन त्या एकमेव गेटमधून केले जातं या एवढ्या मोठ्या मार्केटमधून सिक्युरिटी गार्डच्या निगराणी मध्ये असताना २० ते २५ लाखा रुपये किंमतीची खाद्य तेल ड्राय फ्रूट ची चोरी होते आहे नक्कीच यामध्ये काहीतरी गोड बंगाल असल्याचे प्रश्नचिन्ह निर्माण होते आहे याची माहिती घेण्याकरता वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जमादार यांना संपर्क करून माहिती विचारली असता आम्ही तपास घेत आहोत असे सांगितले तर याकडे पोलीस प्रशासन काय व कशा प्रकारे कारवाई करेल ते पाहणं तितकच महत्त्वाचा आहे.

# पोटच्या मुलाकडून ८० वर्षीय आईवर चाकूने वार ; संपत्तीच्या वादातून घडला प्रकार

**पुणे । प्रतिनिधी**

विसर्जन सोहळा सुरू असताना कौटुंबिक वादातून मुलाने ८० वर्षीय आईवर चाकूने वार केल्याची धक्कादायक घटना शनिवार पेठेतील मेहुणपुरा परिसरात शनिवारी रात्री घडली. या प्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी ६५ वर्षीय मुलाला आईचा खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी अटक केली.अविनाश पांडुरंग साप्ते (६५, रा. मेहुणपुरा, शनिवार पेठ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.



कुसुम साप्ते (८०) असे गंभीर जखमी झालेल्या ज्येष्ठ महिलेचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी अविनाश साप्ते यांचा भाचा आशिष अशोक समेळ (४५, रा. मेहुणपुरा, शनिवार पेठ) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.आरोपी अविनाश, त्याची आई कुसुम आणि फिर्यादी आशिष हे शनिवार पेठेतील मेहुणपुरा भागातील एका सोसायटीत राहायला आहेत.

संपत्तीवरून त्यांच्यात वाद सुरू आहेत. अविनाश साप्ते रात्री दारू पिऊन घरी आला. त्यानंतर त्यांनी आई कुसुम साप्ते यांच्याशी वाद घातला त्यानंतर त्यांचा चेहरा आणि डोक्यावर चाकूने वार केले. आजीला वाचविण्यासाठी आशिष समेळ यांनी मध्यस्थी केली असता त्याच्यावरसुद्धा चाकूने वार केले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत, अविनाशला अटक केली असून, सहायक पोलीस निरीक्षक कारके पुढील तपास करीत आहेत.

# गणेशमूर्तीदान केलेल्या भाविकांना सेंद्रिय खताचे वाटप; पुणेकरांचा उपक्रमाला मोठा प्रतिसाद

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देत महापालिकेला गणेशमूर्ती दान करणाऱ्या भाविकांसाठी भूमिग्रीन एनर्जी एनवायरो केअर एलएलपीतर्फे मोफत सेंद्रिय खताचे वाटप करण्यात आले.



कंपनीकडून उरुळी देवाची येथील महापालिकेच्या वर्षानुवर्षे साठून असलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प राबविण्यात येत असून, त्यातून ओल्या कचऱ्याच्या माध्यमातून दर्जेदार सेंद्रिय खत तयार केले जाते. पर्यावरण संवर्धनाचा भाग म्हणून कंपनी दरवर्षी या उपक्रमात सहभागी होत असते.

महापालिकेकडून गेल्या काही वर्षांपासून शहरातील नागरिकांना गणेशमूर्ती विसर्जनाऐवजी मूर्तीदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पुणेकरांकडून या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत असून, यंदा तब्बल १ लाख ७२ हजार गणेशमूर्ती दान करण्यात आल्या आहेत.या पार्श्वभूमीवर कंपनीतर्फे शहरातील अनेक विसर्जन घाटांवर गणेशमूर्तीदान करणाऱ्या भाविकांना भेट म्हणून सुमारे १५ हजार किलो सेंद्रिय खत वाटण्यात आले. प्रत्येक पिशवीत तीन किलो खत असून, तब्बल साडेपाच हजार पिशव्या वाटप झाल्या. हा उपक्रम दरवर्षीप्रमाणे यंदाही यशस्वीपणे राबविण्यात आल्याचे कंपनीचे संचालक पंकज पासलकर, विजय टिळेकर आणि कमलेश सिंग यांनी सांगितले.

# विमानतळासाठी शेतकरी पुढे सरसावले ; मुंजवडीतील ९० टक्के क्षेत्राची संमती

**पुणे । प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी जमीन देण्यास शेतकरी स्वत:हून पुढे येत असल्याचे चित्र दिसत आहे. भूसंपादनासाठी संमतीपत्रे देण्याच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, मागील १५ दिवसांत सात गावांमधील १ हजार ६०० शेतकऱ्यांनी १ हजार ७५० एकर क्षेत्रासाठी संमतीपत्रे जिल्हा प्रशासनाकडे सादर केली आहेत.



यामध्ये सात गावांपैकी मुंजवडी गावातील सुमारे ९० टक्के शेतकऱ्यांनी संमतीपत्रे दिलेली आहेत, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, पारगाव, मुंजवडी, खानवडी या सात गावांमधील जमिनीचे संपादन करण्यात येणार आहे. पूर्वीच्या अधिसूचनेनुसार हे क्षेत्र २ हजार ६७३ इतके होते.आता त्यात १ हजार ३८८ हेक्टरची कपात करून हे क्षेत्र १ हजार २८५ हेक्टर करण्यात आले आहे. भूसंपादनासाठी दि. २५ ऑगस्टपासून समंतीपत्रे स्वीकारण्यास जिल्हा प्रशासनाकडून सुरुवात झाली. मुंजवडी या गावातील सुमारे ७६ हेक्टर जमिनीची आवश्यकता असून, आतापर्यंत ७० हेक्टर क्षेत्राची संमतीपत्रे जिल्हा प्रशासनाकडे शेतकऱ्यांनी दिली आहे. संमती देण्यासाठी दि. १८ सप्टेंबरपर्यंत अंतिम मुदत आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

# भटक्या-विमुक्त समाजालाही एसटी प्रवर्गात समाविष्ट करा; पद्मश्री लक्ष्मण माने यांनी केली मागणी

**भोर । प्रतिनिधी**

भटक्या-विमुक्त समाजाच्या हक्कांसाठी गेली अनेक दशके सुरू असलेल्या लढ्याला नवी दिशा देण्यासाठी येत्या बुधवार, १० सप्टेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण होणार आहे. या पार्श्वभूमीवर आज खोपी येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. या पत्रकार परिषदेला भटक्या-विमुक्त समाजाचे नेते माननीय पद्मश्री उपराकार लक्ष्मण माने उपस्थित होते.



माने यांनी यावेळी स्पष्ट केले की, हैद्राबाद गॅझेटमधील ऐतिहासिक नोंदीच्या आधारे मराठा समाजाचा 'कुणबी मराठा' म्हणून समावेश सरकारने मान्य केला. त्याचे आम्ही स्वागत करतो. परंतु, याच गॅझेटमध्ये भटक्या-विमुक्त समाजाची नोंद आदिवासी समाज म्हणून झालेली आहे. त्यामुळे आमच्या समाजातील ४२ जाती-जमातींचा समावेश एसटी प्रवर्गात करणे हे शासनाचे कर्तव्य आहे.ते पुढे म्हणाले की, कित्येक वर्षांपासून आम्ही आरक्षणासाठी लढा देत आहोत. बाहेरच्या राज्यांतील प्रस्ताव किंवा नोंदी सरकारने कधीही ग्राह्य धरल्या नाहीत. मात्र आता हैद्राबाद गॅझेटला मान्यता देऊन मराठा समाजाच्या मागणीला प्रतिसाद देण्यात आला आहे. तर आमच्या मागणीला का नाही? हा प्रश्न आमच्या समाजासमोर उभा आहे.या पत्रकार परिषदेत आणखी एक महत्त्वाची बाब घडली. भोर तालुक्यातील सर्व समाजातील स्थानिक नागरिक आणि विविध प्रवर्गांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन भटक्या-विमुक्त समाजाच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा दिला. या संदर्भाचे पत्र स्वतः उपस्थित पद्मश्री लक्ष्मण माने यांना देण्यात आले. यामुळे हा संघर्ष केवळ भटक्या-विमुक्तांचा नसून, संपूर्ण समाजाचा लढा असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.पत्रकार परिषदेत समाजबांधवांनी शासनाने तातडीने न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला. तसेच मुंबईतील उद्याच्या उपोषणासाठी सर्व स्तरातून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला जाणार असल्याचे सांगण्यात आले. भोर-वेल्हा तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो भटक्या-विमुक्त बांधव चलो मुंबई, चलो आझाद मैदान या हाकेला प्रतिसाद देत रवाना होणार आहेत. त्यामुळे उद्याचे उपोषण ऐतिहासिक ठरणार असून, शासनाने या लढ्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक असल्याचे स्पष्ट संकेत या पत्रकार परिषदेतून देण्यात आले.

# पुण्यात हिंदू देवतेची विटंबना, शिवलिंग, नंदीची तोडफोड करून आरएसएस कार्यकर्ता फरार

**पुणे । प्रतिनिधी**

केशवनगर मुंढवा भागातील गोदरेज इन्फिनिटी सोसायटी मधील कमिटीचा अजब प्रकार आज उघडकीस आला. ८ सप्टेंबर रोजी पहाटे तीनच्या सुमारास सोसायटी मधील धर्मद्वेष्ट्या समाजकंटकांनी सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेर्यांची दिशा बदलली. तसेच सोसायटीच्या आवारात असलेल्या महादेवाचे शिवलिंगाला व समोरील नंदी महाराजांची मूर्ती तोडून नदीत फेकून देण्यात आली.





मंदिराच्या ठिकाणी कचरा टाकण्यात आला. स्वतःला आरएसएस चा कार्यकर्ता म्हणवणारा गोदरेज इन्फिनिटी सोसायटीचा कमिटी मेंबर व त्यांचे सहकारी यांनी हिंदू देवतेची विटंबना केली आहे. पोलीस प्रशासनाकडून मात्र अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात असल्याबाबत सोसायटी सदस्यांनी खंत व्यक्त केल्याने शिवसेना पुणे शहरप्रमुख संजय मोरे यांच्या नेतृत्वामध्ये या सर्व गोष्टींची गंभीर दखल घेउन निषेध व्यक्त करत तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी सोसायटीतील रहिवासी, स्थानिक नागरिक, शिवभक्त व शिवसैनिक आंदोलनात सहभागी झाले होते. समाजकंटक आरोपींवर गुन्हे दाखल करून लवकरात लवकर अटक करा आणि कठोर कारवाई करावी अशी मागणी शिवसेनेच्या वतीने व रहिवाशांच्या वतीने करण्यात आली.

शहरप्रमुख संजय मोरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनप्रसंगी उपशहरप्रमुख आबा निकम, सुरज मोराळे, विद्याताई होडे, अमृत पठारे, विभाग प्रमुख दिलीप व्यवहारे उपविभाग प्रमुख गिरीश गायकवाड, दिनेश निकम, शाखाप्रमुख अमर देशमुख, सोमनाथ गायकवाड, राहुल बायस, प्रवीण हिलगे, प्रवीण रणदिवे, अंकित अहिरे, ओमकार अवताडे, सुमित नवले, संदीप ढवळे, अभिषेक गावडे, बाळासाहेब सणस, देवेंद्र तमाईचीभाट, ओंकार बडगुजर, अक्षय बांगर, गणेश काळसइत, संतोष होडे, संतोष ढोरे, फय्याज जमादार, गोदरेज इन्फिनिटी सोसायटीच्या वतीने सुजित पवार, आशुतोष नारखेडे, वाहतूक सेनेचे दत्तात्रय घुले, राहुल शेडगे, नितीन निगडे, विजय पालवे, अमोल डोईफोडे, आशा भुजबळ, सुनिता मेटकरी, सुरेखा क्षीरसागर, वैशाली गायकवाड, मीना मगर, भाग्यश्री कांबळे, आदी उपस्थित होते.

# डेक्कन स्पोर्ट क्लब कोल्हापूर एनजीओच्या वतीने ओझर शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

**ओझर । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील ओझर येथील श्री विघ्नहर विद्यालयात डेक्कन स्पोर्ट क्लब कोल्हापूर एनजीओच्या वतीने ८ सप्टेंबर रोजी एक सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात शाळेतील ४१० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. शिक्षक दिन (५ सप्टेंबर) आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वर्धापन दिनाचे (७ सप्टेंबर) औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. डेक्कन स्पोर्ट क्लबच्या सभासदांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी हा पुढाकार घेतला, ज्यामुळे स्थानिक समुदायात आणि शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले.



या दप्तर वाटप कार्यक्रमात डेक्कन स्पोर्ट क्लब कोल्हापूर एनजीओचे सभासद उदय पाटील, वैभव बेळगावकर, मंगेश गाडे, स्वरूप सुतार आणि स्वप्निल कवठेकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाला विघ्नहर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळकृष्ण कवडे, सचिव सुनील घेगडे, विश्वस्त विनायक मांडे, सूर्यकांत दादा रवळे आणि संतोष कवडे यांच्यासह शाळेच्या मुख्याध्यापिका अनघा घोडके आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या गणित अध्यापिका उज्वला खाडे यांनी प्रास्ताविकाने केली, तर इंग्रजी विषयाचे शिक्षक अनिल भोजने यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळली. विज्ञान विषयाचे शिक्षक अभय पानसरे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता केली. मुख्याध्यापिका अनघा घोडके यांनी डेक्कन स्पोर्ट क्लबच्या या सामाजिक कार्याचे कौतुक केले आणि उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

# पीएमपीचा चालकांसाठी कडक नियम ; मोबाइल वापरल्यास थेट निलंबन

**पुणे । प्रतिनिधी**

प्रवाशांच्या सुरक्षेसाठी महत्वाचे पाऊल उचलताना पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) आपल्या तसेच खासगी चालकांसाठी नवे नियम लागू केले आहेत. बसचालक गाडी चालवताना मोबाइल किंवा हेडफोन वापरताना आढळल्यास त्याला थेट निलंबित केले जाणार आहे.पीएमपी चालक गाडी चालवताना मोबाइलचा वापर करत असल्याच्या अनेक घटना घडल्या असून यामुळे अनेकदा अपघातही घडले आहेत. चालकांकडून मोबाइल वापरण्याचे प्रमाण वाढत आहे.



अनेकदा प्रवाशांनी गाडी चालवताना चालक मोबाइलवर बोलत असल्याचे, समाजमाध्यमांचा वापर करत असल्याचे किंवा हेडफोन लावून बसल्याचे व्हिडिओ वेळोवेळी समाजमाध्यमांवर टाकले आहेत. मोबाइल वापरामुळे अपघात घडण्या बरोबर पीएमपी बसचेही नुकसान होते.पीएमपीएमएलच्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेतला गेला. नव्या आदेशानुसार चालकांनी ड्यूटीवर जाण्यापूर्वी स्वतःचा मोबाइल वाहकाकडे जमा करणे बंधनकारक केले आहे. त्यानंतर चालक गाडी चालवत असताना मोबाईल किंवा हेडफोन वापरताना आढळल्यास किंवा तशी तक्रार प्राप्त आल्यास संबंधित चालकावर तत्काळ निलंबनाची कारवाई होणार आहे. आगार व्यवस्थापकांनी आपल्या आगारातील खाजगी बस पुरवठादारांनाही या सूचनेची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. चालकाची ड्यूटी संपल्यानंतर त्याला मोबाइल परत घेता येईल.

# लोकअदालतीत वाहतूक दंड भरण्याची सुवर्णसंधी; १० ते १३ सप्टेंबरदरम्यान पुणेकरांना लाभ

## ३ महिन्यांत ट्रॅफिक दंड न भरल्यास ड्रायव्हिंग लायसन्स होणार रद्द, विमाही महागणार

**पुणे । प्रतिनिधी**

हेल्मेट, सीटबेल्ट न वापरणे, सिग्नल तोडणे, विना नंबरप्लेट वाहन चालविणे यासारख्या किरकोळ वाहतूक नियमभंगांवरील प्रलंबित दंड जास्तीत जास्त सवलतीने भरण्याची सुवर्णसंधी पुणेकरांना मिळणार आहे. राष्ट्रीय लोकअदालतीच्या निमित्ताने हा उपक्रम १० ते १३ सप्टेंबरदरम्यान येरवडा पोस्ट ऑफिसशेजारील वाहतूक शाखा कार्यालयात राबविण्यात येणार आहे.



मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, पुण्यातील सर्व न्यायालयांमध्ये १३ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्याआधारे पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि पुणे शहर वाहतूक पोलिसांच्या पुढाकारातून प्रलंबित वाहतूक दंड तडजोडीच्या मार्गाने निकाली काढता येणार आहेत. या उपक्रमात प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन, सचिव न्यायाधीश सोनल पाटील, मोटार वाहन न्यायालयाचे न्यायाधीश एस. बी. पाटील, पोलिस आयुक्त अमितेश कुमार आणि वाहतूक उपायुक्त हिम्मत जाधव यांचा सहभाग आहे.